


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२३ ■ शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# देवेंद्र फडणवीस यांची राहुल गांधींना कोपरखळी





## मानवी बुद्धिमत्ता कमी पडली तर ए आय मदतीला

**मुंबई:** नवी दिल्ली येथे पार पडलेल्या 'इंडिया ए आय इम्पॅक्ट समिट २०२६'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ए आय) भूमिकेवर सविस्तर भाष्य केले. तसेच समिटदरम्यान त्यांनी हलक्या फुलक्या शब्दांत राजकीय विरोधकांवरही टीका केली. कधी कधी मानवी बुद्धिमत्ता कमी पडते, तेव्हा ए आय मदत करू शकते, असे म्हणत त्यांनी विरोधकांना कोपरखळी लगावली.

याशिवाय, हा ए आय समिट भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. वेगाने बदलणाऱ्या ए आय क्षेत्रात भारताने साधलेली प्रगती जगासमोर मांडण्याची ही संधी असल्याचे ते म्हणाले. विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवणाऱ्या ए आय संदर्भात जागतिक नेते भारतात येऊन चर्चा करत आहेत, ही बाब देशाच्या वाढत्या क्षमतेचे द्योतक आहे. विशेषतः कृषी क्षेत्रातील ए आय आणि महाराष्ट्राने साधलेल्या यशावर केंद्रित सत्राला मोठा प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

जग सध्या अत्यंत निर्णायक टप्प्यावर उभे असल्याचे त्यांनी नमूद केले. हवामानातील वाढती अनिश्चितता, घटत चाललेली भूजल पातळी, मातीची खालावत चाललेली सुपीकता, कमकुवत होत चाललेल्या पुरवठा साखळ्या आणि अनियमित बाजारपेठ या कारणांमुळे जागतिक अन्न प्रणालींवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः ग्लोबल साऊथमधील देशांसाठी शेती ही केवळ आर्थिक क्रिया नसून उपजीविका, सामाजिक स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षेचा आधारस्तंभ आहे, असे ते म्हणाले.

भारताने तंत्रज्ञानावर आधारित सर्वसमावेशक विकासाची दिशा स्वीकारली असल्याचे सांगताना फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उल्लेख केला. 'इंडिया ए आय मिशन'चा उद्देश तंत्रज्ञानाच्या मदतीने पारदर्शकता, सर्वसमावेशकता आणि मोठ्या प्रमाणावर परिणाम साधणे हा आहे, असे त्यांनी सांगितले. मात्र या ध्येयपूर्तीत कृषी क्षेत्राला मध्यवर्ती स्थान देणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी ठामपणे मांडले. भारतातील अर्ध्या अब्जाहून अधिक लोकांचा थेट किंवा अप्रत्यक्ष उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. तरीही लहान भूधारकांना तुटपुंज्या माहितीचा आधार, वाढते इनपुट खर्च, हवामानातील अनिश्चितता आणि कर्ज व बाजारपेठेपर्यंत मर्यादित पोहोच अशा अडचणींना सामोरे जावे लागते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### शेतकरी ए आय स्वीकारण्यास तयार

राज्य सरकारने विकसित केलेल्या ए आय-सक्षम मोबाईल प्लॅटफॉर्मचा उल्लेख करताना त्यांनी त्याला शेतकऱ्यांसाठी डिजिटल मित्र असे संबोधले. हा प्लॅटफॉर्म बहुभाषिक असून प्रत्येक शेतकऱ्याच्या गरजेनुसार वैयक्तिक सल्ला, बाजार माहिती आणि शासकीय योजनांपर्यंत सुलभ प्रवेश उपलब्ध करून देतो. ए आय शेतकऱ्यांसाठी डिझाइन केले गेले तर शेतकरी ते स्वीकारण्यास तयार आहेत, असे ते म्हणाले. कापूस उत्पादकांसाठी भू-स्थानिक विश्लेषण आणि नंतरच्या देखरेखीच्या यंत्रणेद्वारे तयार करण्यात आलेल्या पूर्वसूचना प्रणालीचा उल्लेख करत त्यांनी त्याला प्रेडिक्टिव्ह गव्हर्नन्स इन ॲक्शन असे वर्णन केले.

### राज्यसभेत सातपैकी सहा उमेदवार महायुतीचे

राज्यसभा निवडणुकीचा कार्यक्रम भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर राज्यातील राजकारणाला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले की, आज एवढंच सांगेन की आमचे भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी अशा महायुतीचे सातपैकी सहा उमेदवार निवडून येणं पक्कं आहे. महायुतीकडे आवश्यक संख्याबळ असल्याचा दावा त्यांनी केला. उर्वरित एक जागा विरोधकांच्या महाविकास आघाडीला मिळण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले. ती जागा कोणी घ्यायची हे त्यांनी ठरवायचं आहे, असा टोला त्यांनी लगावला. त्यांच्या या वक्तव्यानंतर राज्यसभा निवडणुकीतील राजकीय समीकरणांबाबत चर्चांना अधिक उधाण आले आहे.

महाराष्ट्रात राबवण्यात येणाऱ्या ए आय आधारित उपक्रमांची माहिती देताना त्यांनी सांगितले की, पारंपरिक कृषी विस्तार व्यवस्था समर्पित असली तरी आजच्या गरजेनुसार तिची गती आणि व्याप्ती अपुरी पडते. ए आय ही परिस्थिती बदलू शकते, असे ते म्हणाले. ए आय या साहाय्याने अतिसूक्ष्म स्तरावरील हवामान अंदाज, कीड प्रादुर्भावाबाबत आगाऊ सूचना, अचूक सिंचन आणि खत सल्ला, पीकआधारित कर्ज मूल्यमापन, पारदर्शक पुरवठा साखळी आणि तत्काळ बाजार मार्गदर्शन शक्य होते. यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेता येतो आणि जोखीम कमी होते, असे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, केवळ तंत्रज्ञानावर विसंबून चालणार नाही, याची जाणीव करून देताना फडणवीस म्हणाले की ए आय चा पाया विश्वासार्ह डेटावर आणि नैतिक प्रशासनावर असला पाहिजे.



# आजपासून दहावी परीक्षा; 26 हजार 353 परीक्षार्थी प्रविष्ट!

## जिल्ह्यात 118 परीक्षा केंद्र, कॉपीमुक्त परीक्षेसाठी शिक्षण विभाग सज्ज

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला :** शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला २० फेब्रुवारीपासून मराठी या भाषा विषयाच्या पेपरने सुरूवात झाली आहे. जिल्ह्यातील ११८ केंद्रांवरून २६ हजार ३५३ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आल्या असून, शिक्षण विभाग सज्ज असल्याचे चित्र शुक्रवारी सर्वच परीक्षा केंद्रांवर दिसून आले. तसेच विद्यार्थ्यांवरही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून वॉच राहणार आहे.

कॉपीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अधिकाऱ्यांचा समावेश असलेली सात विशेष भरारी पथके व बैठक पथके अशी यंत्रणा राबविण्यात येणार आहे. तसेच दक्षता समिती व कॉपीमुक्तीसाठी इतर आवश्यक यंत्रणा असणार आहे. परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना प्रथम सत्रासाठी सकाळी १०.३० वाजता परीक्षागृहात प्रवेश दिल्यानंतर लगेच उत्तरपत्रिकेचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर ठीक ११ वाजता प्रश्नपत्रिकेचे वाटप करण्यात आले.

### १० मिनिटांचा मिळणार अतिरिक्त वेळ

विद्यार्थी हित लक्षात घेऊन व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करुन यावर्षीसुध्दा परीक्षांसाठी १० मिनिटे अतिरिक्त वेळ वाढवून देण्यात आला आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पेपर सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे प्रश्नपत्रिका देण्याची पध्दत बंद करण्यात आली आहे.

### परीक्षा केंद्र सीसीटीव्हीच्या निगराणीत

ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही उपलब्ध आहेत, तिथे परीक्षा कॅमेराबध्द घेण्यात येणार आहे. ज्या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही उपलब्ध नसेल तेथील शिक्षकांची अदलाबदली होणार आहे. तसेच प्रश्न पत्रिका फुटणे, कॉपी साहित्य पुरवठा किंवा इतर गैरप्रकारांना आळा बसावा म्हणून प्रत्येक परीक्षा केंद्राभोवती ५०० मीटरवरील सर्व झेरॉक्स मशीन बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावरील रनर, पर्यवेक्षक यांच्या वेब कॅमेरे आणि झूम लिंकद्वारे नियंत्रणा कक्षातून सर्व हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. तसेच परीक्षा काळात सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात जमावबंदीचा आदेश लागू केला आहे.

# दहावीची परीक्षा चक्क शामियान्यात! बीड जिल्ह्यातील धक्कादायक घटना

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**बीड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने आजपासून दहावीच्या परीक्षांना उत्साहात प्रारंभ झाला आहे. मात्र बीड तालुक्यातील कुर्ला परीक्षा केंद्रावर एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विद्यार्थी संख्या जास्त असल्याचे कारण देत विद्यार्थ्यांना चक्क शामियान्यात (पेंडॉल) परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण विभागाची वास्तव समोर आले आहे.

सध्या शासनाच्यावतीने मोठ्या गाजावाजा करीत कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी सर्वच वरिष्ठ अधिकारी झटत असताना एका



ठिकाणी चक्क परीक्षेसाठी शामियाना असतानाही याकडे कोणाचे लक्ष गेले नाही, ही मोठी शोकांतिका आहे. या घटनेवरून बीडमधील शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ समोर आला आह बीड तालुक्यातील कुर्ला येथे दहावीचे परीक्षा केंद्र आहे. मात्र या केंद्रावर परीक्षार्थी विद्यार्थांना पेपर सोडविण्यासाठी मंडपाची व्यवस्था करण्यात आली. विद्यार्थी संख्या वाढल्याचे कारण देत हा मंडप उभारण्यात आला असून येथेच विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे. सध्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना उकाड्याचा त्रास सहन करीतच परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्यांचे डोळ्यात हे वास्तव झणझणीत अंजन घालणारे असेच आहे.

# बिश्नोई गँगचे अकोल्यातील अकोट येथे निशाणा





प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोट:** महाराष्ट्राच्या राजकारणात आणि गुन्हेगारी जगतात खळबळ उडवणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कुख्यात लॉरेन्स बिश्नोई गँगने आता आपला मोर्चा विदर्भातील सत्ताधारी भाजप नेत्यांकडे वळवला असून, अकोट मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या नावावर २ कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली आहे.

भाजपच्या अकोट शहराध्यक्षांना 'सिग्नल' या गोपनीय मेसेजिंग अ?पद्वारे धमकीचा कॉल आला. हा कॉल बिश्नोई गँगचा मुख्य सूत्रधार शुभम लोणकर याने केल्याचे समोर आले आहे. 'आमदार प्रकाश भारसाकळे यांच्याकडून २ कोटी रुपये वसूल करून दे, अन्यथा तुला आणि आमदाराला बघून घेईन,' अशा शब्दांत लोणकरने शहराध्यक्षांना थेट धमकी दिली आहे.शुभम लोणकर हा मूळचा अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील नेव्होरी गावचा रहिवासी आहे. राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी लोणकरने स्वीकारली होती.

# लाडक्या बहिणींची संख्या ५० टक्क्यांपर्यंत घसरली! ८६ लाख महिलांनी निवडला चुकीचा पर्याय!

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**मुंबई :** लाडक्या बहिणींकडून ई-केवायसीचे अर्ज भरताना चुकीचे पर्याय निवडले गेल्याने जवळपास ८६ लाख महिलांना फटका बसला आहे. आता त्यांना ई-केवायसीमध्ये चूक दुरूस्त करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत दिली आहे. गतवर्षी २.४ कोटी पात्र महिलांना लाभार्थी हप्ता मिळाला तर जानेवारीपासून केवळ १.६ कोटी महिलांना हप्ता मिळाला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींची संख्या एका झटक्यात जवळपास अर्ध्यावर आली आहे.

ई-केवायसी पडताळणी सुरू झाल्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या ८६ लाखांनी कमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या वर्षापर्यंत महाराष्ट्रात या योजनेंतर्गत २.४ कोटींहून अधिक लाभार्थी महिला होत्या. परंतु ई-केवायसीद्वारे पडताळणी सुरू झाल्यानंतर डिसेंबर २०२५ महिन्यात फक्त १.६ कोटी लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता मिळाला. जानेवारी महिन्याच्या मध्यात हा हप्ता मिळाला होता. म्हणजेच एकूण ८६ लाखांच्या लाभार्थ्यांचा घट झाला आहे. दरम्यान या योजनेअंतर्गत पात्र महिलांना ई-केवायसी करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे. मात्र ही मुदत फक्त चुका दुरुस्त करण्यासाठी आहे. नव्याने केवायसी करण्याची मुदत संपली आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत देण्यात येतेय.

### ३१ मार्चपर्यंत अपडेटची संधी

ई-केवायसी प्रक्रिया करताना काही लाभार्थ्यांकडून चुकीचा पर्याय निवडला गेला. त्यामुळे योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषकरून ज्या पात्र लाभार्थ्यांनी ई-केवायसी करूनही त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळालेला नाही. अशा सर्व बहिणींना आपली ई-केवायसी माहिती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे. ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून ३१ मार्च २०२६ पर्यंत ई-केवायसी दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे महिला व बालविकास मंत्री अदित तटकरे म्हणाल्या.

# आता एसटी प्रवाशाच्या सवलतीसाठी लागणार 'एनसीएमसी' कार्ड!

## एसटी महामंडळाचा निर्णय : ग्रामीण भागातील नागरिकांना मनस्ताप

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**पुणे:** आधार कार्ड किंवा साधे ओळखपत्र दाखवून निम्म्या तिकिटात प्रवास करणाऱ्या महिला आणि शंभर टक्के सवलतीचा आनंद घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा प्रवास आता सुकर होण्याऐवजी मनस्तापजनक होणार आहे. एसटी महामंडळाने नवीन निर्णय आणला असून, यापुढे आता प्रवासात सवलत हवी असल्यास 'एनसीएमसी' (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) अनिवार्य करण्यात आले आहे. या कार्डशिवाय आता सवलतीची लालपरी गाठणे कठीण होणार आहे. खिशात कार्ड नसेल, तर प्रवासासाठी पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे सुरुवातीला तरी प्रवाशांना त्रास सहन होणार आहे. या कार्डमुळे प्रवास




अधिक सुलभ, सुरक्षित आणि पूर्णपणे पारदर्शक होणार असल्याचा दावा केला जात आहे. सवलतीची अचूक नोंद, रोखविरहित व्यवहार आणि पारदर्शक प्रतिपूर्ती ही तिन्ही वैशिष्ट्ये एकाच कार्डमध्ये असतील. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारातून हा बदल करण्यात आला आहे. शिवाय कॅशलेस प्रवासाला चालना देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. प्रशासनाने हा निर्णय पारदर्शकतेसाठी घेतला असला, तरी ग्रामीण भागातील चित्र मात्र वेगळे आहे. रांगेत उभे राहून कार्ड काढणे, ते वेळेवर रिचार्ज करणे आणि तांत्रिक अडचणी हाताळणे यामुळे ग्रामीण महिला व ज्येष्ठ प्रवाशांची मोठी ससेहोलपट होणार आहे. केवळ आधार कार्डवर मिळणारी सवलत आता इतकी किचकट का केली, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

### एनसीएमसी कार्डसाठी मोजावे लागणार १९९ रूपये!

प्रवाशांना एनसीएमसी कार्डसाठी १९९ रुपये मोजावे लागणार आहेत. जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास सवलतीच्या दरात म्हणजेच १४९ रुपयांत नवीन कार्ड दिले जाणार आहे. हे कार्ड केवळ ओळखपत्र नसून ते एक प्री-पेड वॉलेट असून यामध्ये किमान १०० रुपयांचा बॅलन्स ठेवणे बंधनकारक राहणार आहे. तसेच प्रवाशांना ५० रुपयांच्या पटीत ते रिचार्ज करता येईल, कार्डची डिलीव्हरी नोंदणी ठिकाणी ३० दिवसांत मिळेल, त्यात आधारकार्डनुसार नाव व फोटो असेल, हे कार्ड रोख समतुल्य व अहस्तांतीरणीय असणार आहे, आरक्षण तिकीट काढताना कार्ड व्हॅलीडेशन करणे आवश्यक आहे, हरवलेले व खराब झालेले कार्ड सशुल्क पद्धतीने बदलून मिळेल.

अकोला मध्यवर्ती बसस्थानक क्र२ मध्ये एनसीएमसी कार्ड १९ फेब्रुवारीपासून वितरणास सुरूवात केली असून, सवलतधारक नागरिकांनी हे कार्ड काढून घेणे अनिवार्य असल्याने त्यांनी ते काढू घ्यावे, यासाठी आधार कार्ड असणे बंधनकार आहे. हे कार्ड काढून आपला सवलतीचा एसटी प्रवास सुकर करावा.

**अंबादास भिवटे**, डेपो मॅनेजर, अकोला

# भाजपला बंडखोराचा मोठा धक्का

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**भिवंडी :** दोन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर आज भिवंडी महानगरपालिकात महापौरपदासाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे बंडखोर नारायण चौधरी विजयी झाले. स्व. विलासरावजी देशमुख सभागृहात दुपारी १२ वाजता सुरू झालेल्या प्रक्रियेनंतर हात वर करून मतदान घेण्यात आले आणि चौधरी यांनी स्पष्ट बहुमत मिळवत भाजपला मोठा धक्का दिला. महापौरपदासाठी एकूण १० नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी नारायण चौधरी यांचे दोन अर्ज होते. दोन्ही अर्ज वैध ठरल्याने पिठासीन अधिकाऱ्यांनी त्यापैकी एक अर्ज ग्राह्य धरला.

# शिक्षण सेवकांसाठी शिक्षण विभागाचा मोठा निर्णय!

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**पुणे :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, १०० टक्के अनुदानित शाळांमध्ये लागू असलेल्या शिक्षण सेवक योजनेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षण सेवक समान किंवा उच्च पदावर रीतसर प्रक्रियेतून नव्याने नियुक्त झाल्यास त्या शिक्षण सेवकाने पूर्ण केलेला कार्यकाळ ग्राह्य धरून केवळ उर्वरित कार्यकाळ पूर्ण करावा लागणार आहे. या निर्णयाचे शिक्षण सेवकांकडून स्वागत करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. शिक्षण सेवक योजना सन २००० पासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, १०० टक्के अनुदानित शाळांसाठी लागू आहे. या योजनेनुसार उमेदवाराला थेट शिक्षक पदावर नियुक्ती न देता तीन वर्षे कालावधीसाठी मानधन तत्त्वावर नियुक्ती देण्यात येते. या कालावधीत उमेदवाराची सेवा समाधानकारक असल्यास त्यास नियमित शिक्षक म्हणून मान्यता देऊन वेतनश्रेणी लागू केली जाते. मात्र, सद्यस्थितीत निश्चित केलेल्या पद्धतीने शिक्षण सेवकपदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराची त्या पदावरील तीन वर्षे कालावधीची सेवा पूर्ण होण्यापूर्वी अन्य समान अथवा असमान शिक्षण सेवकपदावर निश्चित केलेल्या पद्धतीने नव्याने नियुक्ती झाल्यास पुन्हा तीन वर्षांचा शिक्षण सेवक कालावधी पूर्ण करावा लागतो. आधीचा सेवाकाळ विचारात घेतला जात नाही.

CMYK

**सिटी न्यूज अमरावती**

शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# परम वैभवी राष्ट्राकरिता हिंदू संमेलन- परिमल नळकांडे

**दर्यापूर :** स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त हिंदू संमेलनाच्या माध्यमातून सज्जनशक्तीने एकत्र येत पंचपरिवर्तनाच्या सामाजिक सद्भाव, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण रक्षण, स्व संबोध व नागरिक कर्तव्य या तत्त्वांचा अंगीकार करून परम वैभवी राष्ट्र बननाकरिता अग्रेसर होता येईल असे प्रतिपादन नरदोडा येथे हिंदू संमेलनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अचलपूर सद्भाव संयोजक प्रा. परिमल नळकांडे यांनी केले.शिवजयंतीच्या पर्वावर घेण्यात आलेल्या या हिंदू संमेलनाला गावातील मोठा संख्येने विद्यार्थी, नागरिक व मातृशक्ती उपस्थित होते. गाव परिसर भगवे ध्वज व पताकांसह सजवून गावकरी व वारकरी संप्रदायातील संत मंडळीनी भारत माता व शिवाजी महाराज यांची पालखी मिरवणूक गावातून काढत वातावरण निर्मिती केली. अमरावती विभाग सहकार्यवाह कमलेशजी भट, अचलपूर जिल्हा गोरक्ष प्रमुख देविदासजी माकोडे, सरपंच विलासजी पोटे, हनुमान मंदिर चे विश्वस्त विनोदजी भोगे, निलेश नारोळकर, माधवराव राऊत कान्होलीकर मंचावर उपस्थित होते.

# भाजप- ॲड. प्रशांत देशपांडे, काँग्रेस-मिलिंद चिमोटे, अनिल अग्रवाल पक्के !

## ♦वायएसपीकडून संजय हिगासपुरे, विनोद गुहे अडीच-अडीचवर्षे ♦ राकाँ प्रशांत डवरे, ॲड. किशोर शेळकेंचे नाव आघाडीवर

♦ शिंदेसेना-बसपा-उबाळाटाकडून दिनेश बूब फायनल ♦ भाजपचा स्वीकृत नगरसेवकांसाठी अडीच-अडीच वर्षाचा पॅटन ♦ सचिन रासने, संजय तिरथकर, प्रशांत शेगोकार यांची चर्चा स्थायी समितीसाठी ♦ भाजप- स्वाती कुळकर्णी, वंदना मडघे, नूतन भुजाडे, शारदा खोंडे, पूजा अग्रवाल, पंचफुला चव्हाण यापैकी पाच ♦ काँग्रेस-ललितारतावा, प्रशांत महल्ले, अस्मा फिरोज खा राकाँ- रतन डेंडुले, प्रमोद महल्ले, मंगेश मनोहरे यांची नावे चर्चेत ♦ शिंदेसेना-बसपा-उबाठा गटाकडून मंजुषा जाधव किंवा विद्या माटे




प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अमरावती:** तब्बल चार वर्षानंतर महापालिकेची पहिली आमसभा शुक्रवारी २० फेब्रुवारीला होत असून यामध्ये ८ स्वीकृत आणि १६ स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात येणार आहे.

यामध्ये प्रथम स्वीकृत नगरसेवकासाठी युवा स्वाभिमानी पार्टीने संजय हिंगासपुरे यांचे अधिकृत नाव घोषित करून आघाडी घेतली तर सकाळपासून रात्रीपर्यंत अमरावतीपासून नागपूरपर्यंत झालेल्या बैठकीत भाजपकडून ॲड. प्रशांत देशपांडे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब झाले, तर दुसऱ्या जागेसाठी सचिन रासने, संजय तिरथकर, प्रशांत शेगोकार यांची चर्चा जोरात होती. विशेष म्हणजे भाजप आणि वायएसपीने स्वीकृत नगरसेवकासाठी अडीच अडीच वर्षाचा फॉम्युर्ला निश्चित केला आहे. यानुसार वायएसपीने विनोद गुहे यांच्या नावाची घोषणा अडीच वर्षानंतरचे स्वीकृत नगरसेवक म्हणून केली आहे. काँग्रेसकडून मिलिंद चिमोटे आणि अनिल अग्रवाल यांची नावे निश्चित झाली आहे. राकाँकडून प्रशांत डवरे आणि ॲड. किशोर शळेकेंचे नाव आघाडीवर आहे. तर शिंदेसेना-बसपा-उबाठा गटाकडून दिनेश बूब यांचे नाव आधीच फायनल झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

शुक्रवारला होणारी स्वीकृत नगरसेवक व स्थायी समिती सदस्य निवड पाहता युवा स्वाभिमानी पार्टीची गुरुवारला बैठक झाली. या बैठकीत आ. रवि राणांसह वायएसपी तसेच

काँग्रेस पदाधिकाऱ्यांची गुरुवारला सायंकाळी बैठक झाली. या बैठकीत माजी महापौर मिलिंद चिमोटे आणि ज्येष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांच्या नावावर काँग्रेसने स्वीकृत नगरसेवकासाठी शिक्कामोर्तब केल्याची माहिती विश्वसनीय सूत्राने दिली. तर स्थायी समितीसाठी काँग्रेसकडून ललिता रतावा, प्रशांत महल्ले, अस्मा फिरोज खान यांची नावे पक्की करण्यात आली आहे.

स्वीकृत नगरसेवक २ आणि स्थायी समितीवर ५ सदस्य भाजपचे जाणार असल्याने ही ७ नावे ठरविण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांच्या दिवसभर बैठकावर बैठका झाल्या. अमरावतीत चर्चा झाल्यानंतर भाजपचे स्थानिक पदाधिकारी नागपुरला गेले. या ठिकाणी त्यांची आ. संजय कुटे आणि डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्यासोबत बैठक झाल्याची माहिती आहे. यांनी प्रथम पक्षश्रेष्ठींचा निर्णय देत अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला स्वीकृत नगरसेवकांसाठी सांगितला. यानुसार स्वीकृत नगरसेवकासाठी ॲड. प्रशांत देशपांडे यांचे नाव पक्के झाले. तर दुसऱ्या नावासाठी सचिन रासने, संजय तिरथकर, प्रशांत शेगोकार शर्यतीत आहे.


पदाधिकाऱ्यांनी स्वीकृतनगरसेवक म्हणून पहिल्या अडीच वर्षासाठी संजय हिंगासपुरे आणि पुढील अडीच वर्षांसाठी विनोद गुहे यांच्या नावावर शिक्कमोर्तब केले. तर स्थायी समितीसाठी प्रशांत वानखडे, प्रियंका पाटणे आणि दिपक साहू यांची नावे घोषित केली.

राकाँकडून प्रशांत डवरे आघाडीवर

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने गुरुवारला सायंकाळपर्यंत स्वीकृत आणि स्थायीची नावे अधिकृत घोषित केली नव्हती. मात्र विश्वसनीय सूत्राने दिलेल्या माहितीनुसार स्वीकृत नगरसेवकासाठी प्रशांत डवरे यांचे नाव आघाडीवर असून माजी महापौर ॲड. किशोर शेळकेंच्या नावाची चर्चा सुरु होती. तर स्थायी समितीसाठी राकाँकडून रतन डेंडुले, प्रमोद महल्ले, मंगेश मनोहरे, मिनल सवई यांची नावे चर्चेत आहे. शिंदेसेना-बसपा-उबाठा गटाकडून स्थायी समितीसाठी मंजुषा जाधव किंवा विद्या माटे यांची नावे चर्चेत आहे.

# आयुर्वेदिक फेशियलने त्वचा निरोगी व पिगमेंटेशनमुक्त

## ♦ सोनाली देशमुख यांचे मार्गदर्शन



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अमरावती :** परिसरातील आर्या ब्युटी पार्लरमध्ये नुकताच त्वचा-सौंदर्य विषयावर विशेष सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारमध्ये सौंदर्यतज्ज्ञ सोनाली देशमुख यांनी आयुर्वेदिक पद्धतीने त्वचेची काळजी कशी घ्यावी आणि पिगमेंटेशन कमी करण्यासाठी कोणते उपाय करावेत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी सांगितले की, बदललेली जीवनशैली, प्रदूषण, चुकीचा आहार आणि सूर्यप्रकाशाचा जास्त संपर्क यामुळे त्वचेवर डाग, काळेपणा किंवा पिगमेंटेशनची समस्या वाढत आहे. अशा वेळी आयुर्वेदिक फेशियल हा सुरक्षित आणि नैसर्गिक पर्याय ठरू शकतो.

आयुर्वेदिक फेशियलमध्ये नैसर्गिक औषधी वनस्पती, हर्बल पावडर, फळांचे अर्क आणि तेलांचा वापर केला जातो. यामुळे त्वचा स्वच्छ होते, रक्ताभिसरण सुधारते आणि त्वचेला नैसर्गिक चमक मिळते. रासायनिक उत्पादनांच्या तुलनेत आयुर्वेदिक फेशियल त्वचेसाठी सौम्य असल्यामुळे दुष्परिणाम कमी होतात.

त्वचेची काळजी घेताना दररोज चेहरा स्वच्छ धुणे, भरपूर पाणी पिणे, संतुलित आहार घेणे आणि सूर्यप्रकाशात बाहेर पडताना सनस्क्रीन वापरणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच तणाव कमी ठेवणे आणि पुरेशी झोप घेणेही त्वचेसाठी महत्त्वाचे आहे. सेमिनारदरम्यान उपस्थित महिलांनी विविध प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त राजापेठ उड्डानपुल येथे आ. रवि राणा यांचा छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा

## ♦ पुतळ्याचे पुजन करुन केली महाआरती



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अमरावती :** रयतेचे राजा छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या जयंती महापर्वानिमित्त अमरावती शहरातील राजापेठ उड्डाणपुल येथे आमदार रवि राणा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, विधिवत पूजन करत मानाचा मुजरा सादर केला व महाआरती सुद्धा केली. तसेच बडनेरा नवी वस्ती शिवाजी चौक व फरशी स्टॉप अमरावती येथे सुद्धा आ.रवि राणा यांच्या हस्ते छत्रपती श्री.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पुजन व महाआरती करण्यात आली. या वेळी उपस्थित शिवभक्तांनी ङ्गछत्रपती शिवाजी महाराज की जयङ्कच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. पूजनानंतर बोलताना आ. रवि राणा म्हणाले की, ङ्गछत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर न्याय, स्वराज्य आणि लोककल्याणाचे मूर्तिमंत प्रतीक होते. त्यांच्या न्यायप्रिय आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे अनुकरण प्रत्येक राजकीय नेत्याने करणे आवश्यक आहे.ङ्क त्यांनी पुढे सांगितले की, शिवाजी महाराजांचा आदर्श हा आजच्या काळातही प्रशासन, राजकारण आणि समाजजीवनाला दिशा देणारा आहे. आ. रवि राणा यांनी आपल्या मनोगतात एक गंभीर मुद्दा उपस्थित करताना सांगितले की, महाविकास आघाडीचे सरकार असताना व उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या आदेशाने राजापेठ उड्डाणपुलावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविण्याचे महापाप झाले होते. ही घटना शिवप्रेमी जनतेच्या भावनांना ठेच पोहोचवणारी होती, असे त्यांनी नमूद केले.तथापि, सध्याच्या राजकीय परिस्थितीकडे लक्ष वेधत आ. राणा म्हणाले, ङ्गआज राज्यात आणि अमरावती महानगरपालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचीच सत्ता आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मान्यता घेवून महानगरपालिकेच्या पहिल्याच आमसभेत भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने राजापेठ उड्डाणपुल येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुन्हा उभारण्याचा ठराव पारित करून भव्य पुतळा उभारला जाईल.ङ्क हा निर्णय शिवप्रेमी नागरिकांसाठी अभिमानास्पद ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी आ. रवि राणा यांनी सर्व नागरिकांना शिवजयंतीच्या शुभेच्छा देत, 'स्वराज्य, स्वाभिमान आणि न्याय या मूल्यांचा अंगीकार करूनच आपण खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करू शकतो,' असे भावनिक आवाहन केले. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले नगरसेवक प्रा.श्री.प्रशांत आनंदराव वानखडे, नगरसेवक श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक श्री.अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक श्री.किशोर चंद्रशेखर जाधव, संजय मुनोत व असंख्य शिवप्रेमी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातून निघाली दिमाखदार रॅली



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अमरावती :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथील विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात दिमाखदार रॅली काढली.

शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह निघालेली ही रॅली विधी महाविद्यालयापासून डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय स्मृती महाविद्यालय (पीडीएमसी) सभागृहापर्यंत वाजत-गाजत पार पडली.

रॅलीदरम्यान ढोल-ताशे, शंखनाद आणि फटाक्यांच्या आवाजाने परिसर दणाणून गेला. विद्यार्थिनींमध्ये शिवजयंतीचा उत्साह स्पष्ट दिसून आला आणि संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. उड्डाणपुलावरून शिवरायांच्या पुतळ्यावर विद्यार्थ्यांनी फुलांचा वर्षाव करून मानाचा मुजरा केला.

या कार्यक्रमाला श्री. शिवाजी शिक्षण संस्था चे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ तसेच प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

रॅलीमुळे विद्यार्थिनींमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमात सर्व प्राध्यापक, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी संघ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मेळघाटातील कुपोषण कधी संपणार- सरपंच ललिता बेठेकर



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**धारणी:** पर्वतरांगांच्या निसर्गरम्य कुशीत वसलेला मेळघाट प्रदेश आजही कुपोषणाच्या भीषण समस्येशी झुंज देत आहे. गेल्या ३५ वर्षांपासून शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नेतृत्व प्रयत्न करत असले तरी कुपोषणाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही.

मेळघाटातील अनेक गावं ही अतिदुर्गम भागात वसलेली आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची दयनीय अवस्था, वीज पुरवठ्याचा अभाव आणि आरोग्य सुविधांची कमतरता ही मूलभूत अडचण आहे. दवाखान्यात पोहोचण्यासाठी योग्य रस्ते नाहीत. बाजारपेठ गाठण्यासाठी तासनतास प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात तर अनेक गावांचा जगाशी संपर्कच तुटतो. अशा परिस्थितीत भौगोलिक एकाकीपणामुळे शासनाच्या योजना कागदावरच राहतात, अशी आमच्या मेळघाटची परिस्थिती आहे, असं काठकुंभ गावच्या सरपंच ललिता बेठेकर एका वृत्त वाहिनीशी बोलताना म्हणाल्या. मेळघाटात आरोग्याच्या सुविधा दिसतात. पण त्या अपुऱ्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांमध्ये कायमस्वरूपी डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी उपलब्ध नाहीत, ही अतिशय गंभीर बाब मेळघाटात पाहायला मिळते. अनेक आरोग्य केंद्रांवर प्रभारी अधिकारीच काम करताना दिसतात. ज्या दुर्गम भागात आरोग्य अधिकाऱ्यांनी जायला हवं, अशा ठिकाणी आरोग्य अधिकारी किंवा संपूर्ण आरोग्य यंत्रणात कधी जात नाही, अशी परिस्थिती असल्याची खंत देखील सरपंच बेठेकर यांनी व्यक्त केली.

# नवसारी येथील झोपडपट्टीतील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती मनपा आरोग्य विभाग अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र महिंद्र कॉलनी मधील आरोग्य वर्धनी केंद्र नवसारी मध्ये आयुक्त सौम्या शर्मा चांडक ,अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक ,आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे ,साथ रोग नियंत्रण अधिकारी , डॉ अकिब वैद्यकीय अधिकारी महिंद्र कॉलनी यांच्या मार्गदर्शनाच्या माध्यमातून येथील झोपडपट्टी मध्ये असंसर्गजन्य आजाराचे शिबिर ,कुष्ठरोग तपासणी तसेच राष्ट्रीय कीटकजन्य कार्यक्रम मधील संसर्गजन्य .जलजन्य कीटकजन्य आजार मलेरिया ,डेंगू चिकन गुनिया चे आजार आहे किंवा नाही ह्या साठी झोपडपट्टी मधील लहान मुलापासून तर म्हाताऱ्या पर्यंत व गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली बीपी, शुगर, ॲनिमिया ,रक्त तपासणी रोगनिदान शिबिर करून शेकडो मूल,मुली, गर्भवती महिला ,यांनी औषधोपचार घेतला तसेच कुष्ठरोग अधिकारी डॉ.विनंती नवरे यांनी कुष्ठरोगाचे लक्षणे व त्या बद्दल माहिती दिली व सर्वाची तपासणी सुद्धा केली डॉ.आकीब वैद्यकीय अधिकारी महिंद्र कॉलनी यांनी सुद्धा स्वच्छता राखून आजार होऊ नये म्हणून मार्गदर्शन केले.

# करिअर म्हणून राजकारण निवडण्याचे धाडस कराल का?

अलीकडे एका मित्राच्या मुलासाठी योग्य करिअरच्या शोधात विविध करिअर मार्गदर्शन संकेतस्थळे पाहताना एक बाब प्रकर्षाने जाणवली आजची जागतिक तरुणाई राजकारणालाही करिअर म्हणून गांभीर्याने विचारात घेत आहे. ही प्रवृत्ती प्रामुख्याने युरोप-अमेरिकेत दिसते; भारतात मात्र अजूनही राजकारण हा 'व्यवसाय' म्हणून स्वीकारण्याबाबत समाजात संकोच आहे.

भारतातील बहुतांश पालकांची मानसिकता पारंपरिक आहे - सरकारी नोकरी, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण, UPSC, kEE-NEET यांसारख्या परीक्षांच्या माध्यमातून स्थिर करिअर. राजकारण म्हणजे अनिश्चितता, संघर्ष, आर्थिक अस्थैर्य, हिंसाचार आणि नैतिकतेवरील प्रश्नचिन्ह—अशी प्रतिमा वर्षानुवर्षे तयार झाली आहे. त्यामुळे आपल्या मुलांनी राजकारणात जावे, अशी अपेक्षा क्वचितच व्यक्त केली जाते.

**बदलाची चाहूल**

तथापि, गेल्या दशकात चित्र हळूहळू बदलताना दिसते. घराणेशाहीच्या पलीकडे जाऊन अनेक सुशिक्षित तरुण-तरुणी राजकारणात प्रवेश करत आहेत. त्यांचे म्हणणे स्पष्ट आहे—राजकारण हे केवळ सत्ता मिळवण्याचे साधन नसून, धोरणनिर्मिती आणि समाजपरिवर्तनाची संधी आहे. योग्य मार्गदर्शन, दीर्घकालीन नियोजन आणि संयम असल्यास हे क्षेत्र अत्यंत परिणामकारक आणि समाधानकारक ठरू शकते.

**जागतिक उदाहरणे: तरुण नेतृत्वाचा उदय**

प्रत्येक देशाची राजकीय संस्कृती वेगळी असते. उदाहरणार्थ, रशिया मध्ये तरुणांना राजकारणात येण्यासाठी एक वेगळी प्रेरणादायी परंपरा आहे.

व्लादिमीर पुतिन यांनी अवघ्या ४७ व्या वर्षी पंतप्रधानपद स्वीकारले आणि त्यानंतर राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान या सर्वोच्च पदांवर दीर्घकाळ प्रभावी भूमिका बजावली. तरुण वयात नेतृत्व स्वीकारण्याची तयारी आणि दीर्घकालीन रणनीती—ही त्यांची वैशिष्ट्ये ठरली.

तसेच दिमित्री मेदवेदेव यांनी ४३ व्या वर्षी पंतप्रधानपद भूषवले. त्यांच्या मते, राजकारण हे जोखीम, धैर्य, त्वरित निर्णयक्षमता, असामान्य संयम आणि उत्कृष्ट मनुष्यबळ व्यवस्थापन यांची कसोटी पाहणारे क्षेत्र आहे. ते स्पष्टपणे सांगतात—'राजकारणात अर्धवट मनाने येता येत नाही. संधीची प्रतीक्षा वर्षानुवर्षे करावी लागते; आणि संधी आली की पूर्ण क्षमतेने झेप घ्यावी लागते.'

युरोपमध्येही तरुण नेतृत्वाचे स्वागत झाले आहे. इमॅन्युएल मॅक्रॉन हे चाळीशीपूर्वीच फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांच्या नेतृत्वाने सिद्ध केले की, वय हे नेतृत्वाचे बंधन नाही; दूरदृष्टी, संवादकौशल्य आणि बदल घडवून आणण्याची जिद्द महत्त्वाची असते.

**भारतातील आशादायी प्रवाह**

भारतातही काही तरुण आणि सुशिक्षित नेत्यांनी वेगळी छाप पाडली आहे. अरविंद केजरीवाल, देवेंद्र फडणवीस, अखिलेश यादव, ओमर अब्दुल्ला, योगी आदित्यनाथ, हेमंत सोरेन यांसारखे नेते तुलनेने तरुण वयात मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. अनेकांकडे उच्च शिक्षण, व्यवस्थापनाची पार्श्वभूमी आणि तांत्रिक विषयांचे ज्ञान आहे.

आजच्या प्रशासनात अर्थकारण, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणीय धोरणे, जागतिक व्यापार यांसारख्या गुंतागुंतीच्या विषयांवर निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे राजकारण हे केवळ भाषणकलेचे क्षेत्र उरलेले नाही; ते ज्ञान, विश्लेषण, संघटनकौशल्य आणि दूरदृष्टी यांचा संगम आहे.

**राजकारण: केवळ सत्ता नव्हे, जबाबदारी**

राजकारण म्हणजे केवळ निवडणूक जिंकणे नव्हे. ते समाजाच्या विविध घटकांमध्ये समन्वय साधण्याची कला आहे. एका यशस्वी राजकारण्याकडे पुढील गुण आवश्यक असतात:

दीर्घकालीन दृष्टीकोन, संकटसमयी त्वरित निर्णयक्षमता, संवाद आणि मनुष्यबळ व्यवस्थापन, टीका सहन करण्याची ताकद, नैतिकता आणि पारदर्शकता याशिवाय, आजच्या काळात सोशल मीडिया, डेटा विश्लेषण, जनमत सर्वेक्षण, धोरणात्मक संवाद या क्षेत्रांमध्ये प्रावीण्य असणेही महत्त्वाचे ठरते. त्यामुळे राजकारण हे बहुआयामी करिअर बनले आहे.

**सामाजिक प्रतिमेतील बदलाची गरज**

भारतात राजकारणाची प्रतिमा बदलणे आवश्यक आहे. जर प्रामाणिक, सुशिक्षित आणि दूरदृष्टी असलेले तरुण या क्षेत्रात आले, तर राजकारणाची गुणवत्ता आपोआप उंचावेल. समाजानेही राजकारणाला 'अंतिम पर्याय' न मानता 'प्रभावी पर्याय' म्हणून स्वीकारले पाहिजे.

**तरुणांसाठी स्पष्ट संदेश**

आज भारत जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक आहे. लोकसंख्येतील मोठा भाग ३५ वर्षांखालील आहे. या ऊर्जेचा उपयोग केवळ कॉर्पोरेट क्षेत्रात नव्हे, तर धोरणनिर्मितीतही झाला पाहिजे.

राजकारण जोखमीचे आहे—परंतु जोखीम जिथे असते, तिथे मोठ्या संधीही असतात. योग्य नियोजन, अभ्यास, संयम आणि समाजसेवेची भावना असेल, तर राजकारण हे केवळ करिअर न राहता राष्ट्रनिर्मितीचे साधन ठरू शकते.

अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रात हजारो विद्यार्थी स्पर्धा करतात; परंतु धोरणनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्यासाठी किती जण पुढे येतात? जर सक्षम आणि नैतिक तरुण राजकारणात आले, तर ते तज्ज्ञांची फळी—IIT, IIM किंवा इतर क्षेत्रातील—आपल्या सल्ल्यासाठी उभी करू शकतात आणि व्यापक निर्णय घेऊ शकतात.

म्हणूनच, प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित होतो—

सुरक्षित वाटेवर चालत राहायचे की बदल घडवण्यासाठी धाडस करायचे?

राजकारण हे अवघड आहे, परंतु प्रभावी आहे.

आणि कदाचित

करिअर म्हणून सर्वात मोठी संधीही!



नितीन बक्षी
अकोला,
९३७०२६०४९१

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला**

**मौजे मजलापुर ता.जि. अकोला येथील गट क्र. ४२९ एकुण क्षेत्रफळ ०.६१ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारातील कुळाचा शेरा कमी करणेबाबत.**

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. दिनेश नारायण जामनिक व इतर रा. मजलापुर ता.जि. अकोला यांनी **मौजे मजलापुर ता. जि. अकोला येथील गट क्र. ४२९ एकुण क्षेत्रफळ ०.६१ हे. आर या शेतजमिनीचे ७/१२ मधील इतर अधिकारात असलेला जानराव अर्जुन रा. दापुरा याने जयराम सोनाजी यास पासून पुर्ण सारा निम्मे माल प्रमाणे वहीतीस केल्यावर कुळाचा हक्क** हा शेरा कमी करणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**(कुणाल झाल्टे)**
**तहसिलदार अकोला**

# सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## हिवरखेड मध्ये हिंदू संमेलनाची जय्यत तयारी; हर्षु ठाकूर, शैलेश पोतदार यांचे व्याख्यान

**हिवरखेड:** येथील नवीन बसस्थानक परिसरात रविवारी भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. याकरिता गावातील तरुण युवक ८ दिवसापासून संमेलनाची जय्यत तयारी करीत आहेत. हिंदू शेरनी म्हणून ओळखल्या जात असलेल्या




हर्षाताई ठाकूर, व शैलेश पोतदार यांचे व्याख्यान होईल.

या संमेलनाचा समस्त हिंदू बंधू, भगिनींनी लाभ घ्यावा असे आवाहन हिंदू संमेलन आयोजन समिती हिवरखेडच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात १८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ

**अकोला:** जिल्ह्यातील १८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ देण्यात आली आहे.

अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा, तसेच बाळापूर तालुक्यातील बहादूरा, सागद, नागद, मांजरी येथील ८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला अकरावी मुदतवाढ देण्यात आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील कोळसरा-१, खापरवाडा-२ (खैरी), लोणसणा, बपोरी, पिंगळा दापुरा, बाळापूर तालुक्यातील काजीखेड-२, हिंगणा शिकारी, मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ, तेल्हारा तालुक्यातील वांगरगाव आदी १० वाळूघाटांना नववी मुदतवाढ देण्यात आली आहे. या वाळूघाटांच्या ऑनलाईन ई-निविदा २४ फेब्रुवारीला दु. १२ वा. पर्यंत स्वीकारण्यात येतील. तांत्रिक लिफाफा व त्यानंतर आर्थिक लिफाफा दि. २५ फेब्रुवारीला उघडण्यात येईल. ई-लिलाव प्रक्रिया दि. २७ फेब्रुवारीला सकाळी १० ते दु. १ वा. दरम्यान होईल, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे यांनी दिली.

## २३ वी अ. भा. बौद्ध धम्म परिषद २१ व २२ रोजी

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला :** २३ वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद गंधकुटी जेतवन श्रावस्ती भरतपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. तथागत सद्धम्म बहुउद्देशीय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ भरतपुर यांनी परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेला देश-विदेशातील पूज्य भिक्खू, भिक्खूनी, श्रामणेर श्रामणेरी व बौद्ध धम्माचे अभ्यासू उपस्थित राहून धम्मदेशना देतील. धम्म परिषदेला उपस्थित राहून ज्ञानाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. बौद्ध धर्म परिषदेतील कार्यक्रमाचे नियोजनानुसार सकाळी पाच ते सहा ध्यान साधना, सकाळी आठ ते ११ धम्म ध्वजारोहण, शिलग्रहण, श्रीरत्न वंदना, परित्राण पाठ व धम्मदेशना होईल. दुपारी दोन ते सहा धम्म परिषदेचे उद्घाटन व धम्मदेशना, रात्री सात ते उशिरापर्यंत धम्मदेसना होईल. भगवान बुद्धाची सुवर्णमूर्ती बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यामुळे उपासक उपासिकांना दान द्यायचे असेल त्यांनी ते द्यावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दोन दिवसांच्या धम्म परिषदेची जय्यत तयारी सुरू आहे.

## शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण सोहळा उत्साहात

वि. प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोट:** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातील मुख्य चौकात आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पुढाकाराने उभारण्यात आलेल्या ब्राँझ धातूच्या १३ फूट उंच भव्य पुतळ्याचा अनावरण सोहळा गुरुवारी सायंकाळी जल्लोषात पार पडला. ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी नागरिक, युवक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगव्या पताका, ढोल-ताशांचा गजर आणि जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला.

अकोट नगर परिषद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सायंकाळी ७ वाजता अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. खासदार अनुप धोत्रे कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी होते. अनावरण होताच उपस्थितांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले.

या प्रसंगी आमदार हरीष पिंपळे, माजी आमदार संजय गावंडे ,नगराध्यक्षा मायाताई धुळे, नगर परिषद उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, मुख्याधिकारी शशिकांत बाबर, तहसीलदार सुनील चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, अकोट शहर पोलीस निरीक्षक अमोल माळवे, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष ?ड. ब्रिजमोहन गांधी, विश्वस्त भानुभाई सेदानी, कैलास गोंडचर, पुरुषोत्तम चौखंडे, अरुण जवंजाळ तसेच सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली.

**१९६९ च्या इतिहासाची आठवण**

अकोट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात यापूर्वी ६ जून १९६९ रोजी ग्वाल्हेरच्या राजे खासदार विजयाराजे शिंदे यांच्या हस्ते छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पहिले अनावरण झाले होते. त्या वेळी शहरातील ऐतिहासिक वास्तू निर्मितीसाठी नेताजी जवंजाळ, बापुसाहेब आसरकर, हिमंतभाई संघाणी, भानुभाई सेदानी, हरीभाऊ देव आदी संस्थापकांनी एकत्र येऊन राष्ट्रीय स्मारक समितीची स्थापना केली होती.

नवीन पुतळ्याच्या अनावरणावेळी अनेक ज्येष्ठ नागरिक व शिवप्रेमींनी १९६९ च्या सोहळ्याचीच पुनरावृत्ती होत असल्याचा उल्लेख करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.



## मराठा महासंघातर्फे शिवरायांची जयंती थाटामाटात साजरी

प्रतिनिधी २० फेब्रुवारी




**अकोला:** अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली. गायत्री नगर हिंगणा रोड स्थित संत श्री गजानन महाराज मंदिरा जवळ मराठा महासंघाच्या वतीने आयोजित या शिवजयंतीच्या कार्यक्रमात महिला विभागीय अध्यक्ष सौ कल्पनाताई बिडवे व नवनिर्वाचित नगरसेविका पूजा पंकज गावंडे, योगिता पावसाळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विधिवत दीप प्रज्वलन व पूजा करण्यात येऊन महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार व विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे यांच्या हस्ते हार अर्पण करण्यात आले. महासंघाचे जिल्हा अध्यक्ष श्री संजय सूर्यवंशी यांनी आयोजन करण्यात आलेल्या या जयंती कार्यक्रमात मोठ्या संख्येने मराठा महासंघाचे पदाधिकारी,महिला, युवक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उत्पादन वाढीसाठी माती परीक्षण आवश्यक- ज्योती चोरे पाटील

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अडगाव बु.:** शेतकऱ्यांना शेतातील मातीचे अचूक परीक्षण करून योग्य खत व्यवस्थापन व्हावे आणि यातूनच शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळाले तर त्यांच्या उत्पादनात निश्चितच वाढ होईल असे मत सेंट्रल कृषक सोसायटीच्या माती परीक्षण प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना जिल्हा मृद परिक्षण अधिकारी ज्योती चोरे पाटील यांनी व्यक्त केले. कृषी विभागाच्या सहकार्याने प्रत्येक तालुक्यात दोन प्रयोग शाळा मंजूर झाल्या असून त्यातील स्थानिक सोसायटी च्या प्रयोग



शाळेचे उत्साहात उद्घाटन झाले संस्थाध्यक्ष मनोहरलाल फाफट यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रयोगशाळेचे उद्घाटन उपविभागीय कृषी अधिकारी तुषार ढंगारे यांचे हस्ते झाले यावेळी जिल्हा मृद परिक्षण अधिकारी ज्योती चोरे पाटील, तालुका कृषी अधिकारी शुभम बुरांडे, माजी सभापती संदीप खारोडे, अकोला वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका रुपाली खारोडे , ग्राम पंचायत प्रशासक डॉ कोमल भास्कर, मंडळ कृषी अधिकारी गौरव राऊत, संस्था उपाध्यक्ष अब्दुल तौफिक, सहायक कृषी अधिकारी विठ्ठल बिहाडे यांची प्रमुख उपस्थिती होती... सुरुवातीला प्रतिमा पुजनानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले आता अडगाव परीसरातील शेतकर्यांना मातीतील पोषक घटकांची कमतरता ओळखून त्यानुसार पीक नियोजन करता येणार असल्याने उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होणार असल्याने या सुविधेचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्षीय भाषणातून मनोहरलाल फाफट यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक गजानन मानकर यांनी, संचालन पत्रकार अशोक घाटे व आभार प्रदर्शन संचालक गजानन मुंगसे यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहाने साजरी




प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**हिवरखेड:** येथील स्थानिक देवळीवेश परिसरातील सामाजिक कार्यकर्ते गोपाल घुंगळ, शंकर संस्थानचे सेवेकरी, शिंदे गट शिवसेनेचे पदाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शोभायात्रा काढली. शोभायात्रेत हजारो शिवभक्तांनी हजेरी लावली. गावात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवाजी चौक, चंडिका चौक, इंदिरा नगर, नगरपरिषद, पोलिस स्टेशन, शाळा, कॉलेज, शासकीय कार्यालय इत्यादी ठिकाणी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. तर गावातील आईकुसुमाई निवासस्थानी कुटुंबासह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उत्साह साजरा केला, भवानी मंदिर येथे शिवाजी महाराज यांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले, यावेळी हिवरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## शिवजयंती निमित्त 'डोनेट युवर सायकल' उपक्रम

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला:** शिवजयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या 'डोनेट युवर सायकल' उपक्रमाचा सोहळा दुसऱ्या वर्षीही उत्साहात झाला. ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प व निलेश देव मित्र मंडळ यांच्या वतीने जठारपेठ येथील कार्यालयात हा प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नाट्यकर्मी दिलीपराव देशपांडे होते. प्रा. नरेंद्र देशपांडे, वैशालीताई देशपांडे, डॉ. स्नेहा गोखले, प्रा .रश्मी देव, वैशाली भारसाकळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंतराव सरदेशपांडे यांनी, तर आभार प्रदर्शन अजय शास्त्री यांनी केले.

पाहुण्यांचे स्वागत कैलास

### ◆ विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला



तिरपुडे, विजय वाघ, संजय देशमुख, राम उमरेकर व दत्ता भांबेरे यांच्या हस्ते करण्यात आले. नगरसेवक निलेश देव, राजेंद्र गुणलवार, अरुण गौतमे, नरेंद्र परदेशी, आशु यादव, निलेश दुधलम, विनोद पाटील, संतोष लोढे, सावंत मेजर, शिरीष पुसेगावकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मधुसूदन पसारकर काका यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच विराज नितीन गव्हारे यांच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

सायकल स्वीकारल्यानंतर गायत्री बालिका आश्रमातील विद्यार्थिनींनी जठार पेठ ते मलकापूर असा सायकल प्रवास केला. नव्या सायकलींसह उत्साहात निघालेल्या या आनंदयात्रेने उपस्थितांचे लक्ष वेधले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला:** जाजू नगर दाबकी रोड परिसरात सावित्रीबाई फुले विकास मंडळ तर्फे साजरी करण्यात आली. सुरुवातीला शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष व राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हा सचिव रंजनाताई शिरसाठ यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्ष सौ. प्रतिभा अवचार, रूपाली वानखडे, शितल जंजाळ, अंजू तेलगोटे, लक्ष्मी गजभार, हिवराळे ताई, शीला गवई, काजल खंडारे जया वानखडे, वंदना शिरसाट, स्वाती दामोदर, दीक्षा भोजने, ज्योती भोजने, सुजाता खंडारे, मनीषा खंडारे, साधना शेगोकार, रमेश गजभार, मोहन हिवराळे, मनोज शिरसाठ, सुनील रणीत, मनीष तेलगोटे, गौरव शिरसाट, प्रमोद वानखडे, प्रेम वानखडे, सुनील अवचार, विजय भोजने, राजेंद्र तेलगोटे, सनी हिवराळे, प्रकाश दांडगे, भोजने काका व अरविंद जंजाळ उपस्थित होते.

## २२ फेब्रुवारी रोजी शेलू वेताळ येथे सर्व शासकीय योजनांचा महामेळावा

### ◆ महामेळाव्यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे: रोशनी बंसल

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला, तालुका विधी सेवा समिती, सर्व शासकीय विभाग आणि अकोला जिल्हा सर्व वकील संघ आयोजित शासकीय सेवा व योजना महामेळाव्याचे आयोजन मुर्तिजापूर तालुक्यातील शेलू वेताळ येथील




श्री वेताळ बाबा मंदीर परिसरात २२ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रशासकीय न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ अनिल स. किलोर यांच्या शुभहस्ते होणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उच्च न्यायालय, मुंबई, तथा पालक न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके उपस्थित राहणार असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला शिवाजी भ. कचरे यांच्या अध्यक्षतेत महामेळावा संपन्न होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक,बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा सदस्य ॲड.मोतीसिंह मोहता अकोला जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. अजय वाघमारे यांची उपस्थिती राहणार आहे.

महामेळाव्यामध्ये शासनाच्या विविध योजनांची माहिती अर्ज भरणे,कागदपत्रांची पडताळणी, प्रातिनिधिक स्वरूपात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार असून अधिकाधिक नागरिकांनी सर्व शासकीय योजनांचा महामेळावा कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष श्री शिवाजी कचरे, सचिव रोशनी बंसल,तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष आसिफ तांबोळी, तालुका वकील संघ अध्यक्ष ॲड.सुनिल कांबे यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त खेंडकर विद्यालयामध्ये पारंपारिक वेशभूषा स्पर्धा

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला:** स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळा, विष्णुपंत खेंडकर विद्यालयात आणि स्व. नारायणराव खेंडकर कॉन्व्हेंट मधे शिवजयंती उत्सव उत्साहात झाला.

कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनचे प्रदीप पवार, तर अध्यक्ष म्हणून माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी फक्त




लढ्यास केल्या नाही तर अठरापगड जातीला सोबत घेऊन त्यांचा विकास घडविण्याचा प्रयत्न केला, आणि स्वराज्याचे सुराज्य कसे होईल याकडे लक्ष दिले. कॉन्व्हेंट विभाग, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारत माता, शिवाजी महाराज, माँ जिजाऊ, सईबाई, ताराबाई, झाशीची राणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, पोलीस, शेतकरी, दूधवाला अशा वेशभूषा केल्या. कार्यक्रमाचे संचालन उषा उबाळे यांनी केले, तर आभार गोपाल वानखडे यांनी व्यक्त केले.

## नगर परिषद मालमत्ता करावरील शास्ती माफी अभय योजना

**मुर्तिजापूर:** मुर्तिजापूर नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील मालमत्ता करावरील शास्ती अंशतः / पुर्णतः माफ करुन कर वसुलीला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना राबविण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे. योजनेचा लाभ जास्तीत




जास्त कर दात्यास मिळण्याकरीता मालमत्ताधारकांनी शास्ती/व्याजाची रक्कम वगळून थकित रकमेचा भरणा करुन ३१/०३/२०२६ पर्यंत अर्ज करावा असे आवाहन नगराध्यक्ष हर्षल साबळे व मुख्याधिकारी निलेश जाधव यांनी केले आहे.

## श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



वि. प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोट:** रुईखेड येथे श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष जेष्ठ शिक्षिका अनिता भराटे ह्या होत्या.कार्यक्रमाची सुरवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे व मूर्तीचे पुजन करून हार अर्पण मुख्याध्यापक निनाद मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.त्यांनतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भाषणे,पोवाडे व वेगवेगळी शिवाजी महाराज यांच्यावर आधारीत गीत गायली.संचालनापासून ते आभारप्रदर्शन पर्यंत हा संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनी केला.या कार्यक्रमाला मार्गदर्शन व छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेल्या कार्यावर संतोष काळे सर व किरण मानकर सर यांनी प्रकाश टाकला .सदर कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर,अनिता भराटे,किरण मानकर,वनिता सरोदे,संतोष काळे,विशाल मांडवे,मंजुषा साठे,अनिल ओखारे,प्रा.रूपेश गायगोले,प्रा.राहुल खंडारे,संगीता पन्नासे,संगीता नाथे,जानव्ही गाठेकर ,शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके,गजानन घुगे,अविनाश सुकोशे व त्याच बरोबर विद्यार्थी गण मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**यवतमाळ :** महाराष्ट्रातील जानेवारी 2026 ते डिसेंबर 2026 दरम्यान मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांनी हा कार्यक्रम प्रसिद्ध केला असून सहसचिव वर्षा भरोसे यांनी याबाबतचे अधिकृत पत्रक जारी केले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील सुधारित तरतुदी तसेच महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपते त्या महिन्याच्या सहा महिने आधीपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित क्षेत्र व हद्दीत कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यवाही तात्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# 'आरएसएस' मुख्यालयावर महामोर्चा

## यवतमाळमध्ये 'भारत मुक्ती मोर्चा'चा एल्गार

प्रतिनिधी २० फेब्रुवारी




**यवतमाळ :** भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांची गळचेपी आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी, भारत मुक्ती मोर्चासह विविध समविचारी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) मुख्यालयावर भव्य 'विशाल महामोर्चा' काढण्यात येणार आहे.

यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आंदोलनाची घोषणा करण्यात आली. या पत्रकार परिषदेला सुनील गवई, बिमोध मुधाने यांनी माहिती दिली. ओडिशा राज्यातील कटक येथे २६ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान ४५ वे बामसेफ आणि १५ वे भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अधिवेशन नियोजित होते. या अधिवेशनासाठी प्रशासनाकडून सर्व वैध परवानग्या प्राप्त झाल्या होत्या. मात्र, ऐनवेळी स्थानिक आर.एस.एस. आणि भाजपा कार्यकर्त्यांच्या दबावाखाली कटक प्रशासनाने या अधिवेशनाच्या परवानग्या रद्द करून त्यावर बंदी घातली. या कारवाईमुळे संघटनेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, हा प्रकार भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ अंतर्गत मिळालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उघड अपमान असल्याचे संघटनेने म्हटले आहे. कटक घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण देशात उमटले असून, त्याविरोधात आता नागपुरात शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. वामन मेश्राम यांनी या अन्यायकारक घटनेविरोधात चार टप्प्यांत देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली होती. नागपूरचा हा महामोर्चा या आंदोलनाचा चौथा आणि निर्णायक टप्पा मानला जात आहे. या मोर्चाचे नेतृत्व वामन मेश्राम आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. या आंदोलनात भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा आणि बहुजन क्रांती मोर्चासह शेकडो सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि शेतकरी संघटना सहभागी होणार आहेत. हा महामोर्चा २२ फेब्रुवारी रोजी सकाळी नागपूरच्या ऐतिहासिक इंदोरा चौकातून सुरू होईल आणि महाल येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयावर धडकेल. या आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनासमोर सहा प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने कटक येथील रद्द केलेल्या अधिवेशनास पुन्हा परवानगी देणे, ओबीसीसह सर्व जातींची जातिनिहाय जनगणना करणे, ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेणे आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांना संरक्षण देणे यांचा समावेश आहे. मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेले ओडिशा सरकार बरखास्त करण्याची मागणीही जोर धरत आहे.

# 'हक्काचे व्याज द्या; अन्यथा ठिय्या!'; २३ फेब्रुवारीपासून आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २० फेब्रुवारी



**घाटंजी :** भविष्य निर्वाह निधी (भ.नि.) वरील व्याजाची थकबाकी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवल्याच्या निषेधार्थ घाटंजीतील शिक्षकांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि चर्चेनंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने २३ फेब्रुवारी २०२६ पासून नगर परिषद घाटंजी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद घाटंजी यांना कठोर शब्दांत निवेदन सादर करण्यात आले आहे. सन २०१२ पासून भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम थकीत असल्याचा गंभीर आरोप संघटनेने केला आहे. या कालावधीत अनेक शिक्षक सेवानिवृत्त झाले, तर काही जण आर्थिक अडचणीत सापडले असल्याचेही संघटनेने नमूद केले आहे.

"हक्काची रक्कम अडवून शिक्षकांना आर्थिकदृष्ट्या गुदमरवणे हा सरळ अन्याय आहे. आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नका," अशा शब्दांत संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. "आता आश्वासनांचा खेळ नको; प्रत्यक्ष निर्णय हवा. अन्यथा आंदोलन तीव्र करू," असा इशाराही देण्यात आला आहे.

संघटनेने स्पष्ट केले की, आंदोलन पूर्णपणे शांततामय मार्गाने करण्यात येईल; मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास जबाबदारी त्यांचीच राहील. कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर टाकण्यात येईल, असेही निवेदनात नमूद आहे. या आंदोलनाचे नेतृत्व शिक्षक संघ अध्यक्ष आशिष साखरकर, उपाध्यक्ष गजानन बंडीवार, कार्याध्यक्ष गजानन गोरे, सरचिटणीस कृष्णा मडावी आणि सल्लागार अरुण पडलवार करीत आहेत. संपूर्ण शिक्षकवर्ग त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असून मोठ्या संख्येने सहभागी होण्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, निवेदनाची प्रत अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय, शिक्षण उपसंचालक, पोलिस अधीक्षक कार्यालय यवतमाळ, नगराध्यक्ष, पोलिस निरीक्षक घाटंजी यांना पाठविण्यात आली आहे. २३ फेब्रुवारीपासून सुरू होणारे ठिय्या आंदोलन प्रशासनाला निर्णय घेण्यास भाग पाडणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# 'तानुबाई बिर्जे' पत्रकारिता पुरस्काराने संदीप खडेकर सन्मानित

प्रतिनिधी २० फेब्रुवारी




**यवतमाळ :** मराठा सेवा संघ आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'छत्रपती महोत्सव २०२६' मध्ये मानाचा तानुबाई बिर्जे पत्रकारिता पुरस्कार दै. 'पुण्यनगरी'चे जिल्हा कार्यालय प्रमुख संदीप खडेकर यांना प्रदान करण्यात आला. येथील 'शिवतीर्थ' वर १८ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीच्या मुख्य सोहळ्यात दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखडे यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, उपाध्यक्ष वसंत घुइखेडकर, अर्बन बँकेचे अध्यक्ष नितीन खर्चे, नगरसेविका वैशाली सवाई, मराठा सेवा संघाच्या विद्या खडसे, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, संदीप खडेकर यांच्यासोबतच त्यांच्या पत्नी उज्वला खडेकर यांचाही यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. संदीप खडेकर हे गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी जिल्ह्यातील ज्वलंत विषयांना वाचा फोडली. विशेषत: त्यांनी चालवलेल्या 'वेध गुन्हेगारी'चा या वृत्तमालिकेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. केवळ बातम्या न देता, त्यामागील गुन्हेगारीचा मुळासकट शोध घेण्याच्या त्यांच्या धाडसी वृत्तीमुळे प्रशासनाला अनेकदा गंभीर दखल घ्यावी लागली. त्यांच्या याच निर्भीड आणि लोकाभिमुख कार्याचा गौरव म्हणून त्यांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# शिवजयंतीनिमित्त समता सैनिक दलाची सलामी

प्रतिनिधी २० फेब्रुवारी



**नेर :** महाराष्ट्राच्या इतिहासातील अभिमानाचा दिवस ठरलेल्या १९ फेब्रुवारी रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना समता सैनिक दलातर्फे अभिवादन व सलामी अर्पण करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात शिवचरित्राचे स्मरण, प्रेरणादायी भाषणे आणि स्त्रीसन्मानाचा जागर संदेश देण्यात आला.

कार्यक्रमात समाजसेविका कांचन वीर, मोखाडे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात जिजामातांनी शिवरायांना दिलेल्या संस्कारांची आठवण करून देत, आज प्रत्येक मातेनं आपल्या मुलांमध्ये शिस्त, स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि नैतिक मूल्ये रुजविण्याची गरज व्यक्त केली. "संस्कारित पिढी घडवणे हीच खरी शिवजयंती," असे त्यांनी सांगितले.

शिवरायांनी आपल्या कारकिर्दीत स्त्रियांच्या सन्मानाचे कठोर धोरण अवलंबले होते. त्यांच्या राज्यात स्त्रीची अब्रू सर्वोच्च मानली जात होती. त्यामुळे आजच्या काळातही स्त्रीसन्मान जपणे, तिच्या अधिकारांची जाणीव ठेवणे आणि समतेचा मार्ग स्वीकारणे, हेच शिवरायांच्या विचारांचे खरे अनुकरण ठरेल, असा सूर वक्त्यांनी लावला. हा कार्यक्रम समता सैनिक दल, दीक्षाभूमी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यकारी अध्यक्ष सोनिका विशाल वाघमारे यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी यवतमाळ जिल्हा अध्यक्ष अर्चना पुरुषोत्तम मेश्राम, जिल्हा उपाध्यक्ष प्रज्ञा संतोष पाटील, जिल्हा ट्रेनर इन्चार्ज मोनिका उमेश भगत, नेर तालुका अध्यक्ष रेखा राऊत, सचिव छाया गुजर, सहसचिव बबिता सवाई, सहयोगिनी प्रेमिला बनसोड, दारवा तालुका अध्यक्ष ललिता भगत, संयोगिनी कोमल मेश्राम यांच्यासह नेर तालुक्यातील विविध गाव शाखांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वटफळी, वटफळा, पिपरी, कलगा, खरडगाव, मालखेड खुर्द, नेर, कोलुरा, सिंदखेड व इरगावन येथील समता सैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्याची शपथ सर्वांनी घेतली. "शिवरायांचे जीवन हे केवळ इतिहास नसून वर्तमान आणि भविष्य घडवणारा प्रेरणास्त्रोत आहे," या संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संत सेवालाल जयंतीनिमित्त नाईक-कारभाऱ्यांचा सन्मान



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**आर्णी:** संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त पळशी तांड्यावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी किसन राठोड (जिल्हा सचिव, भाजपा यवतमाळ तसेच राष्ट्रीय अध्यक्ष, बंजारा एकता परिषद) यांच्या हस्ते तांड्यातील ग्रंथवाचक व नाईक-कारभाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

संत सेवालाल महाराजांच्या विचारांचा जागर जागर प्रसार व्हावा, तसेच समाजात ऐक्य व सामाजिक बांधिलकी दृढ व्हावी, या उद्देशाने राठोड यांनी प्रत्येक तांड्यावर भेट देत मान्यवरांचा गौरव केला. या प्रसंगी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात संत सेवालाल महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प करण्यात आला.

# श्रावणीने रांगोळीतील कलाकृतीतून साकारले छत्रपती शिवाजी महाराज

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**आर्णी :** आर्णी शहरातील सिसोदिया लेआऊटमध्ये राहणाऱ्या 9 व्या वर्गातील विद्यार्थिनी श्रावनी विजय चौधरीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने रांगोळीच्या माध्यमातून एक भव्य कलाकृती साकारली आहे. रेणूका मंगल कार्यालयाच्या सभागृहात तिने 11 फुट रुंद आणि 17 फुट लांब आकाराची रांगोळी काढली, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांची अत्यंत देखणी आणि प्रभावी प्रतिमा साकारली आहे. एकूण 20 किलो रांगोळीच्या वापराने महाराजांचा ऐतिहासिक आणि शौर्यपूर्ण चेहरा उभा केला आहे. मागील तीन वर्षांपासून श्रावनी रांगोळी आणि चित्र काढण्यात निपुण झाली असून, कुटुंबातील शेतकरी माता-पित्यांकडून मिळालेल्या पाठबळामुळे तिच्या कलेला वाव मिळाला आहे. रांगोळी आणि कागदावर चित्रे रेखाटण्यात तिला आपले कौशल्य निखरवताना आत्मविश्वास वाटतो, असे ती सांगते. श्रावनीच्या या सर्जनशील कलेला स्थानिक नागरिक आणि कुटुंबाने प्रोत्साहन दिल्यामुळे ती आज या उंचीवर पोहोचली आहे.



# चिमुकल्यांच्या रोजाने रमजानची सुरुवात ; जूनेद-अनायनाचा प्रेरणादायी संकल्प

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**आर्णी :** पवित्र रमजान महिन्याला उत्साहात सुरुवात झाली असून शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. मुस्लिम बांधवांकडून रोजा, नमाज व प्रार्थनेतून आत्मशुद्धीचा संकल्प केला जात आहे. विशेष म्हणजे यंदा लहान मुलांनीही रोजा पाळत समाजासमोर आदर्श ठेवला आहे. आर्णी येथील नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती जावेद सोलंकी यांचा सहा वर्षीय मुलगा जूनेद सोलंकी तसेच पुतणी अनायना (वय ६) यांनी रमजानचा पहिला रोजा ठेवला. इतक्या लहान वयात उपवास पाळण्याचा निर्धार करत त्यांनी धार्मिक परंपरेची जपणूक केली. यावेळी आजी बतूल बी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



चिमुकल्यांच्या या कृतीचे परिसरात कौतुक होत असून त्यांच्या श्रद्धा व चिकाटीमुळे अनेकांना प्रेरणा मिळत आहे. रमजानच्या पहिल्याच दिवशी या बालकांनी दाखविलेल्या धार्मिक निष्ठेमुळे आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# शेतकऱ्याची विषारी प्राशन करून आत्महत्या

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**उमरखेड:** अतिवृष्टीने खरडून गेलेली शेती, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अडीच लाखांचे कर्ज आणि सततची नापिकी या तिहेरी संकटाला तोंड देऊ न शकलेल्या उमरखेड तालुक्यातील कुरळी येथील शेतकरी संदीप अंशीराम आढागळे (वय ३७) यांनी स्वतःच्या शेतात विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली.

२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता घडलेल्या या घटनेनंतर मोठ्या भावाने त्यांना तात्काळ यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, दीर्घ उपचारानंतर १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी चार वाजता संदीप यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. संदीप यांच्या पश्चात विधवा आई, एक



अविवाहित बहीण, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा मोठा परिवार अवलंबून आहे. ७ एकर शेतीवर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अडीच लाख रुपयांचे कर्ज असल्याने संदीप नेहमीच चिंतेत असायचे. अखेर कर्जबाजारीपणाला कंटाळून त्यांनी असे पाऊल उचलले. या घटनेने परिसरातील नागरिक हादरले आहे.

# उमरखेडमध्ये शिवजयंतीचा जल्लोष

प्रतिनिधी २० फेब्रुवारी







**उमरखेड :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त उमरखेड शहरात भव्य उत्सव साजरा झाला. बाजार समिती प्रांगणातून सजवलेल्या भव्य रथातून राजांच्या प्रतिमेची दिमाखदार शोभायात्रा काढण्यात आली. जयघोष, ढोल-ताशांचा नाद, लेझीम पथकांचे थरारक प्रात्यक्षिक आणि भजन-भारुडांच्या गजराने आसमंत दणाणून गेला. शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित या मिरवणुकीत आकर्षक देखावे, चित्तथरारक कराटे प्रात्यक्षिके, बंजारा नृत्य, बिरसा मुंडा आदिवासी नृत्य पथक, अश्वदळ आणि विविध शालेय पथकांनी शिवप्रेमींचे डोळे पारणे फिटले.

गोपिकाबाई गावंडे कॉलेज, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, नागापूर (प) शालेय मुलींची लेझीम पथके, महात्मा ज्योतिबा फुले शाळेचे ढोल-ताशा पथक, एस.एम.ए. कराटे क्लासेस यांच्यासह बेलखेड येथील भजनी मंडळाने उत्साह वाढवला. शहरातील प्रमुख मार्गावरून निघालेल्या या शोभायात्रेत शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध लक्षवेधी वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. शहर व तालुक्यातील हजारो शिवभक्तांनी या थाटामाटात सहभाग घेतला. शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष गजानन देशमुख (भैय्या पवार), वसंतराव देशमुख, सुरेश कदम, गुलाबराव सूर्यवंशी यांच्यासह भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, आमदार किसन वानखेडे, नगराध्यक्ष तेजश्री जैन, काँग्रेस नेते नंदकिशोर अग्रवाल, राम देवसरकर, दत्तराव शिंदे, ॲड. संतोष जैन, शिवसेना नेते चितांगराव कदम, प्रवीण पाटील मिराशे, संतोष जाधव, कृष्णा पाटील देवसरकर, संदीप ठाकरे, अजय नरवाडे, सिद्धेश्वर जगताप आदी विविध राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. सायंकाळी चार वाजता उत्सवाचे विसर्जन झाले.

संपूर्ण उत्सव यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीने अथक परिश्रम घेतले, तर उमरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवून सुरक्षितता सुनिश्चित केली. या भव्य शिवजयंतीने उमरखेडमध्ये राजांच्या आदर्शांचा जयघोष पुन्हा एकदा घुमवला, तर शिवप्रेमींमध्ये नवउत्साह संचारला.

# 'मिशन ४१ दिवस'द्वारे थकबाकी वसुली गतीमान करा : राजेंद्र पवार

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**यवतमाळ:** वीजबिलाची वसुली हा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) चा एकमेव आर्थिक स्त्रोत असून संपूर्ण अस्तित्व वीजबिलांच्या वसुलीवर अवलंबून आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या उर्वरित ४१ दिवसांत नियोजनबद्ध मोहीम राबवून थकबाकी शून्यावर आणावी, असे निर्देश महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले. येथील विद्युत भवनमध्ये आयोजित उपविभागनिहाय आढावा बैठकीत ते बोलत होते.




जिल्ह्यातील वीजस्थिती आणि वसुलीच्या कामाचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. अखंडित वीजपुरवठ्यासाठी महावितरणला आर्थिक स्थैर्य अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी 'मिशन ४१ दिवस' जाहीर करून जिल्ह्यातील यंत्रणेला सक्रिय होण्याचे आदेश दिले. वीजबिल वसुलीला सर्वोच्च प्राधान्य देत क्षेत्रीय स्तरावर ठोस कृती आराखडा तयार करावा. थकबाकीदारांचा सातत्याने पाठपुरावा करून सामूहिक प्रयत्नातून वसुली वाढवावी. वारंवार आवाहन करूनही प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा नियमानुसार खंडित करावा, असेही त्यांनी सांगितले. वसुलीसोबतच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौरकृषी पंप आणि स्मार्ट सौरघर या योजनांचा जास्तीत जास्त ग्राहकांना लाभ मिळवून

### वीज चोरीविरोधी मोहीम अधिक तीव्र करण्याचेही निर्देश

द्यावा, असे आवाहन करण्यात आले. वितरण हानी कमी करण्यासाठी वीज चोरीविरोधी मोहीम अधिक तीव्र करण्याचेही निर्देश देण्यात आले. ग्राहकसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगत कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यात आली. महावितरण बळकट करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीला अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, कार्यकारी अभियंते पुरुषोत्तम चव्हाण, ब्रजेश गुप्ता, जनार्दन चव्हाण, व्यवस्थापक प्रमोद चव्हाण, पंडित आंबेकर यांच्यासह उपविभागीय अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com









## कॉपीमुक्त अभियान नव्हे कॉपीयुक्त अभियान....

# परीक्षा नव्हे सत्व परीक्षा, ही तर शिक्षा !

* भरारी पथकाची संस्थानिकांसह दलालांमध्ये धास्ती
* केंद्र संचालक व पर्यवेक्षकांचा जीव टांगणीला
* अनेक शाळांनी घेतले 'सोयीचे' परीक्षा केंद्र
* शिक्षण विभागातील भ्रष्ट मंडळीचे अर्थपूर्ण मौन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यात बारावी व दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये दरवर्षी गैरप्रकार करून लाखो रूपयांची कमाई करणाऱ्या चांडाळ चौकडीने कर्तव्यदक्ष प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्या भरारी पथकाची धास्ती घेतल्याची चर्चा आहे. गावात परीक्षा केंद्र असताना अनेक शाळांनी बारावी व दहावीच्या परीक्षेसाठी त्यांना सोयीस्कर असलेले परीक्षा केंद्र घेतले असल्याचे समजते. या सर्व गैरप्रकाराला तालुक्यापासुन विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी संस्थानिकांकडून मलिदा लाटून सोयीच्या परीक्षा केंद्राला परवानगी दिली असल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे. मात्र खऱ्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परिक्षा नसून सत्व परिक्षा आहे. काहींतर विनाकारण शिक्षा होत आहे. त्यामुळे शहरी -ग्रामीण असा भेदभाव न करता मोठ्या लोकप्रतिनिधीच्याही शाळांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.





कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेवून डॉक्टर व इंजिनिअर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या धनदांडग्या पालकांच्या लाडक्या मुला-मुलींना हमखास चांगल्या गुणांनी पास करण्यासाठी अनेक दलालांनी संस्था स्थापन करून शासनाकडून स्वयंअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयाची परवानगी घेतली. शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण करणाऱ्या दलालांनी वाशीम जिल्ह्यातही मागील अनेक वर्षापासून लाखो रूपयाची कमाई केल्याची चर्चा आहे. वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराची किड लागल्यामुळे महाराष्ट्रात बदनाम होण्याचा वाशीम जिल्हा अव्वल स्थानावर पोहोचला आहे. वाशीम जि.प.च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाची सूत्रे काही महिन्यापुर्वीच संजय ससाने यांनी स्विकारलीत.

आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडून प्राथमिक शिक्षण विभागाचा कारभार पारदर्शक करण्यासाठी त्यांचे योगदान कौतुकास्पद आहे.

प्रारंभी संजय ससाने यांना परीक्षा काळात भरारी पथकापासुन दूर ठेवण्यासाठी दलालांनी पुढाकार घेतला.परंतु ससाने साहेबांच्या प्रामाणिकपणाची दखल जिल्हाधिकाऱ्यांनी घेवून ससाने साहेबांच्या 'वन मॅन आर्मी 'ला हिरवी झेंडी दिली.

ससाने साहेबांनी आपल्या धडाकेबाज कारवाईस जोरदार प्रारंभ केला आहे.त्यांच्या भरारी पथकाची केंद्र संचालक,पर्यवेक्षकांनी धास्ती घेतली असून अनेक शिक्षक पर्यवेक्षकाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी चक्क नकार देत असल्याची चर्चा आहे.

### सामूहिक कॉपी प्रकरणात अडकले बालक , आक्रमक झाले पालक

वाशिमच्या टो येथील श्री मैनागिरी महाराज विद्यालयातील सामूहिक कॉपी प्रकरणी आता पालक वर्ग सुद्धा आक्रमक झाले आहे. निष्पाप विद्यार्थ्यावर झालेल्या मानसिक आणि शैक्षणिक अन्याय झाला असून या प्रकरणाचे तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी पालकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठत निवेदन दिले आहे. १६ फेब्रुवारी रोजी प्राथमिक शिक्षणाधिकारी ससाने आणि त्यांच्या भरारी पथकाने वाशीम च्या टो येथील मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय येथील परीक्षा केंद्राची पाहणी केली. दरम्यान या केंद्रावर एकूण ५८१ विद्यार्थी उपस्थित होते. या मधील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची नमुना तपासणी केली असता, बहुसंख्य विद्यार्थ्यांची उत्तरे शब्दशः समान असल्याचे आढळून आले. यावरून मैनागिरी महाराज महाविद्यालयात ५८१ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कॉपी केल्याचे उघड झाले होते . या प्रकरणी शिक्षण विभागाकडून परीक्षा केंद्रावरच्या दोषी असलेल्या २६ शिक्षक निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर आता या कारवाईचा शिक्षक संघटनांकडून निषेध करण्यात येत होतं. या कारवाई विरुद्ध पालक वर्ग आक्रमक झाल्याचे बघायला मिळाले.या कारवाईमुळे निष्पाप विद्यार्थ्यावर या अन्याय झाल्याचं पालकांकडून सांगितले जात आहे. याप्रकरणी संबंधित पालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत योग्य न्याय देण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### तहसील कार्यालयात बाथरूम व स्वच्छालय चे घाणीचे साम्राज्य

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर तहसील कार्यालय हे तालुक्यातील महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र मानले जाते. दररोज विविध शासकीय कामांसाठी शेकडो नागरिक येथे ये-जा करतात. मात्र, कार्यालय परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ शौचालये आणि दुर्गंधीमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.



संडास व बाथरूमची नियमित स्वच्छता होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पिण्याच्या पाण्याजवळही अस्वच्छता असल्याचे दिसून येत असून त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया 'शासकीय कार्यालयातच अशी अवस्था असेल तर सामान्य नागरिकांनी कुठे जावे?' असा सवाल येथील नागरिक उपस्थित करत आहेत. तहसील कार्यालय हे प्रशासनाचे प्रतिक मानले जाते; मात्र येथेच स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

तहसीलदार कार्यालयाच्या देखरेखीखाली येणाऱ्या परिसरात इतकी अस्वच्छता असताना अद्याप ठोस कारवाई झालेली नाही, अशी चर्चा आहे. संबंधित विभागाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तहसील कार्यालय मध्ये तीन चार शिपाई असून एक दिवस पण ऑफिसमध्ये हप्ता मधून साफसफाई केल्या जात नाही संडास बाथरूम जर बघितले तर सार्वजनिक ठिकाणी पण एवढी घाण बघण्यास मिळत नाही अधिकारीला स्वतःकडे एक प्रश्नल बाथरूम ठेवली आहे त्याला लॉक केले आहे महिला कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी पण तहसील कार्यारतला बाथरूमला ताला ठोकला आहे बाकी शेकडो लोक तेसील कार्यालयामध्ये कामानिमित्त येतात त्यांना त्या घाणीचा तेवढा वास दुर्गंध येतोय पण जनतेच्या सोयीसाठी कोणत्याच प्रकारे बाथरूमची व्यवस्था नाही आहे. मंगरूळपीर तहसील कार्यालयातील ही परिस्थिती लवकरात लवकर सुधारावी, अन्यथा नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे दुष्परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# कारंजा येथे 'मिनी सरस प्रदर्शन- २०२६'चे आयोजन

### महिला बचत गटांच्या उत्पादनांची भव्य प्रदर्शनी व विक्री

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महिला स्वावलंबनाचे उद्दिष्ट समोर ठेऊन आणि स्थानिक महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणारी जिल्हास्तरीय मिनी सरस प्रदर्शनी व विक्रीचा उपक्रम दि. २३ फेब्रुवारी पासुन कारंजा येथे 'वऱ्हाडी जत्रा' नावाने आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत धाबेकर सांस्कृतिक सभागृह, अमरावती रोड, कारंजा लाड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेले खाद्यपदार्थ, मसाले, पापड-लोणची, हस्तकला, सजावटीच्या वस्तू, कापडी साहित्य आदींची प्रदर्शनी व विक्री होणार आहे. दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता या मिनी सरस प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ होणार असून उद्घाटन दत्तात्रय भरणे, मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, वाशिम यांच्या हस्ते होणार आहे.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार संजय देशमुख, खासदार अनुप धोत्रे, भावना गवळी (सदस्य, विधान परिषद), किरण सरनाईक (सदस्य, विधान परिषद), वसंत खंडेलवाल (सदस्य, विधान परिषद), धिरज लिंगाडे (सदस्य, विधान परिषद), धर्मगुरु बाबूसिंग महाराज राठोड (सदस्य, विधान परिषद), अमित झनक (सदस्य, विधानसभा), श्याम खोडे (सदस्य, विधानसभा) तसेच सईताई डहाके (सदस्य, विधानसभा) उपस्थित राहणार आहेत.विशेष निमंत्रित म्हणून योगेश कुंभेजकर (जिल्हाधिकारी, वाशिम) व अनुज तारे (पोलीस अधीक्षक, वाशिम) यांची उपस्थिती राहणार आहे.दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत प्रदर्शनी व विक्री आयोजित करण्यात आली असून सायंकाळी ४ वाजता सत्कार व निरोप समारंभ होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी अर्पित चौहान (प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम) राहतील. कार्यक्रमाला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जि. प. चे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण

'वहाडी जत्रा' ही केवळ वस्तुंची प्रदर्शनी किंवा पारंपरिक स्वरुपातील जत्रा नसून ग्रामीण महिलांच्या कष्टांना, कौशल्याला आणि स्वाभिमानाला व्यासपीठ देणारा उत्सव आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला बचत गटांच्या उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे.

**- अर्पित चौहान (भाप्रसे),**
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

'वहाडी जत्रा' अर्थात बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्री व प्रदर्शनी कार्यक्रमात पाचही दिवस सर्वांनी उपस्थित राहुन उमेद अभियानाला चालना व गती देण्यासाठी सहकार्य करावे.

**-किरण गणेश कोवे,** प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम

### वऱ्हाडी खाद्य पदाभार्थांचे विशेष आकर्षण:

या प्रदर्शनिचे विशेष आकर्षण म्हणजे पाचही दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनिमध्ये कारंजावासीयांना विविध खाद्य पदर्थांची मेजवानी मिळणार आहे. यासाठी यामध्ये फुड कोर्ट नावाने स्वतंत्र दालन तयार करण्यात आले आहे. यामध्ये अस्सल वऱ्हाडी चवीने समृध्द असलेले मटण- मांडे, सळोई, वऱ्हाडी चिकन, कोंबडी-वडा, ज्वारीची व बाजरीची भाकरी, मिसळीची भाकरी, झुणका भाकर, मिरची ठेचा, वांग्याचे भरीत, हरबऱ्याची भाजी, भरड्याची भाजी, पुरण- पोळी, तीळ-गुळ पोळी, उसळ यासोबतच आणखी विविध खाद्य पदार्थाचा गावरानी मेवा असणार आहे.

### कृषी सहायकांचे अप -डाउन ठरली

# शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहता जिल्हास्तरावरून येणे जाणे करतात त्यामुळे नागरिकांची कामे खोळबंत आहे. पण याचं काहीच सोयरसुतक संबंधितांना नाही. तालुक्यातील बहुतांश कृषी सहाय्यक मुख्यालयी न राहता तालुक्याच्या तर काही कृषी सहाय्यक जिल्ह्याच्या ठिकाणी राहून कारभार पाहतात. त्यामुळे कृषी सहाय्यकाचे अप डाउन शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे.

#### दलालांच्या माध्यमातून मर्जीतील शेतकऱ्यांना योजनेचा लाभ...

#### वरिष्ठांनी लक्ष देणे गरजेचे...

विशेष म्हणजे काही कृषी सहाय्यक केवळ आपल्या मर्जीतील शेतकऱ्यापर्यंत या योजनेचा लाभ कसा पोहोचवता येईल, यासाठी हे कृषी सहाय्यक प्रयत्न करतात दिसतात. मर्जीतील शेतकऱ्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याचा दलालीतून कृषी सहाय्यक मोठी मलाई मिळवत असल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे. वरिष्ठ अधिकारी या बाबीकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन न करणाऱ्या व मुख्यालयी न राहणाऱ्या कृषी सहायकावर कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

यांचे वरिष्ठ अधिकारी सुद्धा अप डाउन करत आहेत. शासनाने कोट्यावधी खर्च करून विविध योजना शेतकऱ्यासाठी आणल्या योजनेची माहिती शेतकऱ्यांपर्यंत कृषी सहाय्यक पोहोचवत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे काम तालुक्यात होत असल्याचे समोर आले आहे.

सर्व जबाबदारी पार पाडण्यासाठी कृषी सहायकांनी नेमून दिलेल्या गावी म्हणजेच मुख्यालयी राहणे बंधनकारक सुद्धा करण्यात आले आहे. गावामध्ये राहून शेतकऱ्यांच्या गाव भेटी घेणे, त्यांना शेती विषयक योग्य मार्गदर्शन करणे शासनाच्या विविध योजनेची विस्तृत माहिती देणे, पिका विषयी विस्तृत माहिती देणे आधी कामे कृषी सहायकांनी करणे अपेक्षित आहे. मात्र तालुक्यातील बहुतांश कृषी सहाय्यक या शासकीय आदेशाची पायमल्ली करत आहेत.

कृषी सहायक नियुक्त गावामध्ये आठवड्यातून एखादी दिवस भेट देतात. काही कृषी सहायकाचे महिन्यातून एखाद्या दिवशीच दर्शन होत असते. त्यामुळे कृषी सहाय्यक नियमित गावांमध्ये येत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागतो.

### आई नामधारी, मुलगाच कारभारी...

# सरपंचाच्या खुर्चीवर बसणे पडले भारी !

### मुलानेच सुत्र, भटउमरा सरपंच अपात्र

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●




ग्रामपंचायत मधील सरपंचाच्या अधिकृत खुर्चीवर बसून कारभार हाकणाऱ्या सरपंच पुत्राला चांगलेच महागात पडले आहे. वाशिम तालुक्यातील भटउमरा येथील सरपंच सौ. गोदावरी सारंगधर काळे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत मुलाला ग्रामपंचायत कामकाजात बेकायदेशीर हस्तक्षेप करु दिल्याची तक्रार बीएसएफचे माजी सैनिक गोपाल आवारे यांनी याबाबत पुराव्यानिशी तक्रार दाखल केल्यानंतर अमरावती विभागाचे अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांना सरपंच पदासाठी अपात्र घोषित केले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण राजकारणात नातेवाईकांच्या हस्तक्षेपावर चाप बसणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

भटउमरा ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत सौ. गोदावरी काळे यांची सरपंच पदी थेट जनतेतून निवड झाली होती. मात्र, १८ सप्टेंबर २०२४ रोजी सरपंच पुत्र हरीभाऊ काळे यांनी ग्रामपंचायत कार्यालयातील सचिव आणि सरपंचांच्या खुर्चीवर बसून कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्याचा आरोप करण्यात आला होता. या गंभीर प्रकरणाची तक्रार बिएसएफ चे सेवानिवृत्त सैनिक गोपाल अशोक आवारे यांनी केल्यानंतर जिल्हा परिषद वाशिमच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशी केली.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार, सरपंचांच्या मुलाने ग्रामपंचायतीच्या खुर्चीवर बसून कारभारात ढवळाढवळ केल्याचे आणि अनेक निर्णय घेण्यास भाग पाडल्याचे स्पष्ट झाले. सरपंचांनी आपल्या मुलाला अशा बेकायदेशीर कृत्यांपासून रोखणे अपेक्षित असताना, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. हा प्रकार शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए: १००५/९४ मधील मार्गदर्शक सूचनांचे थेट उल्लंघन असल्याचे निष्पन्न झाले. या परिपत्रकानुसार, पदाधिकाऱ्यांच्या निकटवर्तीयांनी कार्यालयीन कामात हस्तक्षेप केल्यास संबंधितांवर कारवाई करण्याची तरतूद आहे.अपर आयुक्तांनी या प्रकरणातील सर्व दस्तऐवज आणि साक्षी-पुराव्यांचा विचार करून निकाल दिला. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) मधील तरतुदींनुसार, पदाचा दुरुपयोग आणि कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत सौ. गोदावरी काळे यांना सरपंच व सदस्य पदासाठी अपात्र ठरवण्यात आले. सरपंचांना अपात्र करण्यासोबतच संबंधित ग्रामसेवकानेही या कृत्यास अटकाव न केल्याने त्यांच्यावरही शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.या ऐतिहासिक निर्णयामुळे लोकशाही मूल्यांचे जतन करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कडक पाऊल उचलल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

### शृंगऋषी महाराज संस्थानच्या सौंदर्यीकरणासाठी...

# पाच कोटीचा निधी देणार - आ.श्याम खोडे

●सिटी न्युज ब्युरो @ अनसिंग●

### शृंगऋषी तिर्थक्षेत्राला 'ब' वर्गाचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्नरत

पौराणिक व ऐतिहासिक महत्व असलेल्या अनसिंग येथील शृंगरूषी संस्थानच्या सौंदर्यीकरणासह विविध विकास कामासाठी शासनाकडून पाच कोटी रूपयाचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती धुरंदर आमदार श्याम खोडे यांनी मंगळवारी येथे दिली.

राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी जो पुत्रकामेष्ठी यज्ञ केला होता, त्या यज्ञाचे संयोजक अनसिंग येथील श्री शृंगरूषी महाराज होते.अशी अख्यायिका आहे.याचा पुराणातही उल्लेख आहे.अनसिंग येथील शृंगरूषी महाराज मंदिर देशभरात प्रसिद्ध असून दरवर्षी श्रावण महिन्यात आणि महाशिवरात्रीला महाराजांच्या दर्शनासाठी विविध प्रांतातून व पंचक्रोशीतून हजारो भाविक येत असतात. मंगळवार १८ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री सोहळ्याच्या महाप्रसादाच्या कार्यक्रमास वाशीमचे लोकप्रिय, धुरंदर आमदार श्याम खोडे अनसिंग येथील श्री शृंगरूषी महाराज संस्थानमध्ये आले होते.यावेळी आमदार खोडे बोलत होते.ते पुढे



म्हणाले, शृंगरूषी महाराज मंदिर परिसरातील दोन एकर जागेमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, मंदिराच्या बाजुला असलेल्या नाल्यावर अत्याधुनिक स्वच्छता गृह बांधणे, नाल्याचे सौंदर्यीकरण, परिसराचे सौंदर्यीकरण, भक्तांसाठी डोम शेड, महाप्रसादासाठी भव्य शेड, आधुनिक स्वयंपाक घर, सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा पथदिवे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि ईतर आवश्यक कामासाठी आपण शासनाकडून पाच कोटी रूपयाचा निधी मंजूर करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.तसेच श्री शृंगरूषी महाराज मंदिर संस्थानला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नरत असल्याचे सांगितले.यावेळी संस्थानचे अध्यक्ष अशोक सारडा, सत्यनारायण सारडा, विश्वस्त अण्णासाहेब राजे, माधव ठाकरे, सारंग सारडा, बबलु बजाज, लक्ष्मण पाबळे, वाशीम बाजार समितीचे संचालक नत्थुजी कापसे, भाजप कार्यकर्ते राजू मानधणे, चंद्रकांत ठाकरे यांचेसह शेकडो भाविक, भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.शृंगरूषी संस्थानच्या वतीने आमदार खोडे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.आमदार खोडे यांनी महाप्रसादाच्या पंगतीमध्ये भाविकांना महाप्रसादाचे वितरण करून आपली सर्वसामान्य लोकांसोबत बांधिलकी असल्याचे दर्शविले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com













गुरूवारी रात्री शिवाजी महाराज पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' सादर करण्यात आली. भूषण झड़पे (शिवाजी महाराज), स्नेहा ठाकुर (जिजामाता), पियूष छंगानी (संभाजी महाराज), संदेश साबोले (शाहजी राजे, कविकलश), आशीष भुवते (रामसिंग, पंत, बहरजी), तन्मय वाघमारे (शाहीस्ते खान, शहजादे अकबर,) साहिल सप्रे (बादशाह औरंगजेब), चैतन्य बिस्सा (कानूजी), जीत मलिक (गानुजी, जीवामहला), सनी सप्रे (हांबिरराव मोहिते, मुक्कबर खान), पिहिका सुरडकर (राणी केसुबाई), सार्थक बोंद्रे (बाल संभाजी महाराज) यांनी उत्तम अभिनय सादर केला.

# महावितरण चा गुप्त निर्णय ! मोदी सरकारच्या महत्वाकांक्षी योजनेला धोका !

## 'गरजां नुसार सौर ऊर्जा क्षमता निवडण्याच्या नागरिकांच्या स्वातंत्र्यावर घाला'

प्रतिनिधी २० फेब्रुवारी



**अकोला :** एकीकडे मोदी सरकार भारताला सौर ऊर्जेत परिपूर्ण बनविण्यासाठी सौर ऊर्जेला अधिकाधिक महत्त्व देत आहे तर दुसरीकडे राज्यातील महावितरण मात्र मोदी सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेला खिळ घालण्याचे प्रयत्न करीत आहे. सौर ऊर्जेचा वापर करण्यासाठी उत्तेजन देण्याऐवजी सौर ऊर्जा धारकांना खच्ची करण्याचे काम महावितरण द्वारे घेण्यात आलेल्या एका गुप्त निर्णयाने समोर आले आहे. सौरऊर्जेचा वापर करणाऱ्या निवासी आणि औद्योगिक ग्राहकांसाठी एक चिंताजनक बातमी आहे महावितरण ने नुकताच एक गुप्त धोरणात्मक बदल केला आहे. ज्याचा थेट परिणाम राज्यातील सुमारे ५० ते ६० टक्के निवासी सौर ग्राहकांवर होईल. १३ फेब्रुवारीपासून लागू झालेल्या या नवीन बदलामुळे आता ग्राहकांना त्यांच्या इच्छा किंवा भविष्यातील गरजा ऐवजी गेल्या बारा महिन्यातील सरासरी वीज वापराच्या आधारावर सौर ऊर्जा खरेदी करण्याची परवानगी मिळेल. पूर्वी ग्राहकांना त्यांच्या भविष्यातील योजना, आणि गरजांनुसार क्षमता निवडण्याचे स्वातंत्र्य होते. त्यामुळे महावितरणचा हा निर्णय एकतर्फी असल्याचे म्हटले जात आहे. सध्याच्या नियमानुसार ग्राहक त्यांच्या मंजूर भारानुसार सौर पॅनल बसू शकत होते परंतु १३ फेब्रुवारी रोजी लागू केलेल्या नवीन सॉफ्टवेअर अपडेट नंतर गेल्या १२ महिन्यातील सरासरी वीज वापराच्या आधारावर सौर क्षमता आता मर्यादित करण्यात आली आहे. जर तुमचा मंजूर भार पाच किलो वॅट असेल परंतु गेल्या वर्षभरात तुमचा सरासरी वापर फक्त शंभर युनिट असेल तर पोर्टल तुम्हाला फक्त एक किलो वॅट सौर ऊर्जा बसवण्याची परवानगी देईल. जर तुम्ही भविष्यात एसी बसवण्याची किंवा इलेक्ट्रिक वाहन खरेदी करण्याची योजना आखत असला तरी, तुम्ही तुमच्या गरजेनुसार मोठी सौर प्रणाली बसू शकणार नाही. या निर्णयामुळे मोदी सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेला धोका निर्माण होण्याची भीती आहे. ग्राहक आधीच जास्त स्थिर शुल्क भरतात त्यामुळे त्यांच्या वैधानिक अधिकाराचे उल्लंघन करणे बेकायदेशीर आहे. जर महावितरण ने हा निर्णय मागे घेतला नाही तर राज्यात तीव्र आंदोलन सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# जवाहर नगर चौक ते शासकीस दूध डेअरी रस्त्यावरील अतिक्रमण काढले

प्रतिनिधी २० फेब्रुवारी




**अकोला :** महानगरपालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने, मनपा उपायुक्त विजय पारतवार, पूर्व झोनचे सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात १८ रोजी जवाहर नगर चौक ते शासकीय दूध डेअरी पर्यंत रस्त्यावरील वाहतुकीस अडचण निर्माण करणारे टीन शेड, ओटे, हात गाड्या, बॅनर, डमी पुतळे आदींचे अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

अकोला शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडचण निर्माण करणारे अतिक्रमण संबंधीत अतिक्रमण धारकांनी स्वत: आपले काढून मनपा प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा मनपा प्रशासनाव्दारा संबंधीत अतिक्रमण काढण्यात येणार आहे कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करावे.

या कारवाईत सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे, राहूल राऊत तसेच अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# मनपात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी २० फेब्रुवारी



**अकोला :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृहात आयोजित कार्यक्रमात मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने, उपमहापौर अमोल गोगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर पीएम श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. २६, शिवसेना वसाहत, पीएम श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला, मनपा मराठी मुलांची शाळा क्र. २२, मनपा मराठी मुलांची शाळा क्र. ४ मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १६, मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १९, हिंदी बालक शाळा क्र. ६ सिंधी हिंदी बालक शाळा क्र. १ या शाळेच्या विद्यार्थ्यांव्दारे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गीत, पोवाडे, नृत्याचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलिप जाधव, सहा.आयुक्त विठ्ठल देवकते, राजेश सरप, शिक्षणाधिकारी हरिष्चंद्र इटकर, मुख्याध्यापक अब्दुल अजीज, राजू अवधूत, गजेंद्र ढवळे, शैलेश शिरसाट, युवराज पठाडे, सौ. मीना देशमुख, मनोज बोचरे, सौ. अंमल मेरी पिल्ले, सौ. सुशीला सोनोने, खान अनीस खान, सौ. विजया कुरुळकर, सौ. अनिता नवलकर, सौ. जयश्री वानखेडे यांचेसह शिक्षक/शिक्षिका आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अपर्णा ढोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजेंद्र ढवळे यांनी केले.

# पॅरीसमध्ये घुमला शिवरायांचा जयघोष



प्रतिनिधी २० फेब्रुवारी

## विदेशात दिमाखाने झळकला तिरंगा

**अकोला :** फ्रान्सची राजधानी पॅरीस येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची जयंती शेतकरी बांधवांनी उत्साह, अभिमान आणि एकतेच्या भावनेतून साजरी केली. युरोप विदेश कृषी अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा विशेष ठरला असून, पॅरीसच्या भूमीवर भगव्याचा स्वाभिमान पाहायला मिळाला. कार्यक्रमादरम्यान 'जय भवानीष्ठ जय शिवाजी!' च्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. विदेशातही महाराष्ट्राचा भगवा दिमाखात फडकताना पाहून उपस्थितांमध्ये उत्साहाची लाट उसळली. शिवरायांच्या कार्याचा व स्वराज्य स्थापनेच्या इतिहासाचा उल्लेख करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित करण्यात आली. या जयंती निमित्त शेतकरी बांधवांनी एकजुटीचा आणि स्वाभिमानाचा संदेश दिला. कृषी अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने युरोपमध्ये एकत्र आलेल्या प्रतिनिधींनी शिवरायांच्या आदर्शांचा जागतिक स्तरावर गौरव करत शेतकरी सक्षमीकरणाचा संकल्प व्यक्त केला.

# देशमुख महिला मंडळाची फेब्रुवारीची मासिक सभा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २० फेब्रुवारी



**अकोला :** देशमुख महिला मंडळ द्वारा आयोजित कांजीवरम ग्रुपची मासिक सभा हॉटेल सेंटर प्लाझा मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून १६ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडली. कार्यक्रमाला अध्यक्ष राजश्रीताई, उपाध्यक्ष नयनाताई ,सचिव स्वप्नालीताई, कोषाध्यक्ष प्रतिभाताई, ज्येष्ठ सल्लागार कविताताई तसेच प्रमुख पाहुण्या संध्या ठाकरे, कांजीवरम ग्रुपच्या लीडर स्नेहल देशमुख मंचावर उपस्थित होत्या.सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. त्यानंतर मा. स्व.अजित पवार व मंडळाच्या सदस्य सविताताई यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सौ. श्रद्धा व सौ. सोनल यांनी संचालन केले. प्रमुख पाहुण्यांचे सुंदर मनोगत झाले. त्यानंतर अध्यक्षांनी आगामी कार्यक्रमांची माहिती दिली. कांजीवरम ग्रुपने पी. एम. श्री. मनपा वरिष्ठ प्राथमिक सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्रमांक ७, रामदास पेठ अकोला येथे केलेल्या उपक्रमाची माहिती सौ. शिल्पाताई यांनी दिली. सौ. सीमाताई यांनी त्यांच्या ग्रुप मधल्या मैत्रिणीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचे कौतुक करून त्यांचा परिचय दिला.पाहुण्यांचा परिचय सौ. केतकी यांनी करून दिला. मंडळाच्या कार्यकारिणीच्या कार्याची दखल घेऊन श्रीमती कविताताई ढोरे यांना नुकताच डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल, तसेच सौ. राजश्रीताई यांना संकल्प सेवा सन्मानाने गौरवित करण्यात आल्याबद्दल आणि देशमुख महिला मंडळाच्या माजी अध्यक्षा ,आरआरसी च्या संचालिका सौ. कल्पनाताई या लिनेस क्लबच्या जिल्हाध्यक्ष झाल्याबद्दल त्यांचा सत्कार कांजीवरम ग्रुप मेंबर्स कडून करण्यात आला. नुकतीच शिवजयंती असल्यामुळे कांजीवरम ग्रुपने शिवजयंती थीम ठेवून आकर्षक अशी राजमाता जिजाबाई यांची वेशभूषा सौ.सिमाताई आणि छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा सौ. शुभांगी यांनी करून श्रोत्यांची मने जिंकली. शिवगर्जना करून राजमाता जिजाबाई आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे आगमन झाले. आम्ही शिवकन्या, शंकरा रे शंकरा रे या गाण्यावर अतिशय बहारदार असे नृत्य करून दिप्ती, केतकी , निशा , वृशाली , सुनीता , योगिनी , माधुरी, स्नेहल यांनी उपस्थितांची मने जिंकली .त्यानंतर चिठ्ठी गेम ची जबाबदारी रेवती , वैशाली यांनी सांभाळून त्यामध्ये अनुक्रमे ,साधनाताई , शैलजाताई, वर्षा ,संजय , संगीता ,वैशाली , किरण , संध्या मोहन ,अनिता , विद्या ,राखी विजयी ठरल्या तसेच वेस्टर्न . ड्रेस कोड ची जबाबदारी , वृषाली , मनीषा , सोनाली यांना देण्यात आली त्यामध्ये अनुक्रमे मनीषा गजानन,अपर्णा, वृशाली , मोहिनी , स्वप्ना आनंद,सीमा नरेंद्र , शिल्पा पंकज, रेवती राजेश, पौर्णिमा ह्या विजयी ठरल्या. सर्वांच्या आवडीचा हौजी गेम घेण्यात आला. त्याची जबाबदारी दीप्ती, विद्या ,मेघा यांना देण्यात आली त्यामध्ये मिलन , कोमल , आराधना , प्रतिभा , संजीवनी , माधुरी, उज्वला , प्रतिभा , संजीवनी ताई , अर्चना ,प्रगती , सुजाता , संगीता ,प्रांजली , संगीता , उमा विजयी ठरल्या. कार्यक्रमाचा शेवट निशाताई यांनी आभार प्रदर्शन करून केला. कार्यक्रमाला कांजीवरम ग्रुपच्या प्रत्येक सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. सुनीता , विद्या ,मनीषा , सोनाली त्यांनी सुरेख अशी शिवजयंती . आणि कांजीवरम ग्रुपचा फोटोची प्रतिमा साकारून सुरेख अशी रांगोळी काढली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रुप लीडर स्नेहल सहित सीमाताई , सुजाताताई, श्रद्धा , रेवती दिप्ती केतकी सिमा सरनाईक , सोनाली ,योगीनी ,माधुरी , विद्या, मेघा ,मनिषा ,वैशाली , वृषाली, सुनिता ,निशा , सोनल ,शिल्पा, सिमा, शुभांगी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# किल्ला चौकात पाण्याचा अपव्यय

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला :** जुन्या शहरात किल्ला चौकात पाईप लाईन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. महापालिका जलप्रदाय विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. उन्हाळ्याची चाहुल लागली असताना दररोज सुरू असलेला पाण्याचा अपव्यय योग्य नाही ही जन भावना आहे. पाईप लाईन दुरूस्ती तातडीने करावी अशी नागरिकांची मागणी आहे.



# शहरात हिंदू संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २० फेब्रुवारी

## राम मंदिरातून निघाली शोभायात्रा

**खामगाव :** हिंदू समाजात नवचैतन्य, जागृती आणि सामाजिक एकतेची भावना अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने टिळक वस्ती परिसरात स्वामी विवेकानंद नगरपरिषद शाळा क्रमांक ९ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या हिंदू संमेलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात राम मंदिर परिसरातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेने झाली. टिळक वस्ती (सिव्हिल लाइन) भागातून मार्गक्रमण करत ही शोभायात्रा स्वामी विवेकानंद नगरपरिषद शाळा क्र. ९ च्या पटांगणात दाखल झाली व तेथे तिचे हिंदू संमेलनात रूपांतर झाले. शोभायात्रेनंतर गौपूजन करण्यात आले. व्यासपीठावर भारत मातेचे पूजन करून छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करत कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. गोंधनापूर येथील नर्मदेश्वर आश्रमाचे हभप. धनेश्वर महाराज ढोरे यांनी मार्गदर्शनात, हिंदू धर्म व संस्कृतीचे संवर्धन टिकवून ठेवण्यासाठी संपूर्ण हिंदू समाजाचे संघटित होणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले. महिला वक्त्या प्रा. मीनाक्षी अंधारे यांनी महिला सक्षमीकरणावर विचार मांडताना सांगितले की, स्त्री सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होते, कुटुंब सक्षम झाले तर समाज आणि राष्ट्र सक्षम होऊ शकते. कुटुंबात व समाजात स्त्रीच्या भूमिकेचे महत्त्व त्यांनी प्रभावी शब्दांत अधोरेखित केले.

प्रमुख वक्ते, विभाग बुलढाण्याचे प्रचारक स्वप्नील राऊत यांनी संघ शताब्दी आणि पंच परिवर्तन या संकल्पनेवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात शैलेश खंडारे यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. हितेश सोनी यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर कवितेने उपस्थितांना भावविवश केले. याप्रसंगी पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूत्रसंचालन अर्चना जामोदे, प्रास्ताविक रवींद्र खराटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जयश्री वरणगावकर यांनी केले.

# शिवशंभू प्रतिष्ठान तर्फे शिव जयंती साजरी




प्रतिनिधी २० फेब्रुवारी

**अकोला :** जुने शहरातील डाबकी रोडवरील वानखडे नगर येथे शिवशंभू सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शिवप्रेमींनी किल्ल्याचा देखावा उभारून शिवरायांचा जयघोष केला. या सोहळ्यात प्रमुख अतिथींमध्ये अन्नपूर्णेश पाटील, संग्राम गावंडे, उपमहापौर अमोल गोगे, कृष्णा शर्मा, मनोज गायकवाड, शशिकांत चोपडे, सुभाष म्हैसणे, वैशालीताई शेळके, माधुरीताई शिरसागर, सोनाली ताई सरोदे, प्रियाताई शिरसाट, राहुल धोटे, मनोज पाटील, गोपाल राऊत, आशिष पवित्रकार, करण साहू, प्रवीण भाऊ हुंडीवाले, अशोक ओळंबे, आकाश शिरसाट, आकाश कवडे, अंकुश तायडे, राजेश काळे, प्रशंसा अंभेरे, अतुल येडने, अमोल ठोकणे, वसंता मानकर, ॲड आशुतोष शर्मा, रमेश गायकवाड, अजय रामटेके, संदीप पवार, हर्षु चौधरी, रुपेश फाटे, अशोक भिसे, योगेश ढोरे यांचा समावेश होता.


CLASSIFIED

**विक्री किंवा भाड्याने**
डॉक्टर, हॉस्पिटल, बँक, कंपनी, ऑफिस करीता उपयुक्त.
१ मजला आणि २ मजला
1800 चौरस फूट हॉल
रामेश्वर अपार्टमेंट,
श्री राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन
जिल्हा परिषद शाळा क्र. 3 समोर, जय हिंद चौक, जुने शहर,
सुसज्ज सर्व सुविधा युक्त मुख्य रस्त्यावर आहे.
9623497321
9421940975

**भाड्याने देणे आहे**
२५X ६० चा हॉल व अट्याच दोन वॉशप आहे
पत्ता : गिरीनगर आप्पा दुध डेअरी जवळ, जुना RTO ऑफीस रोड, अकोला (आप्पा दुध डेअरीच्या बाजूला)
मो. 9922670850
9309379112

**फ्लैट फ्लैट फ्लैट**
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लैट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लैट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलोनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**प्लाट प्लाट प्लाट**
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लाट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK